शुक्रवार, १ जुलै 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 297
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 1 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-297 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# महाराष्ट्रात एकनाथांची शिंदे‘शाही’

## एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्री तर देवेंद्र फडणवीसांनी उपमुख्यमंत्रीपदाची घेतली शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : जवळपास दहा दिवसांच्या सत्तासंघर्षाची अखेर अवघ्या चार तासांतील नाट्यमय घडामोडींनी झाली. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री असतील, अशी जोरदार चर्चा असताना फडणवीसांनी धक्कातंत्र वापरत शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याची घोषणा केली. त्यानंतर राजभवनातील दरबार हॉलमध्ये आज संध्याकाळी साडेसात वाजता एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ दिली.**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने मी एकनाथ संभाजी शिंदे शपथ घेतो की... असे म्हणत शिंदेंनी गोपनीयतेची शपथ घेतली. त्यासोबतच देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथग्रहण केली. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, प्रवीण दरेकर, सुधीर मुनगंटीवार, आशीष शेलार, पंकजा मुंडे यांच्यासह वरिष्ठ भाजप नेते आणि एकनाथ शिंदे यांचे कुटुंबीय उपस्थित होते.
विधानपरिषद निवडणुकांच्या निकालानंतर तब्बल ११ दिवस चाललेल्या राजकीय नाट्याची आज अखेर झाली. काल रात्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चा होत्या. दुपारपर्यंत माध्यमांवर आणि सोशल मीडियावर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री हेच समीकरण असल्याच्या चर्चा होत्या. मात्र देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी राजभवनात जाऊन राज्यपालांची भेट घेत सत्तास्थापनेचा दावा केला. त्यानंतर पत्रकार परिषद घेत एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री होणार असल्याचे फडणवीसांनी जाहीर केले होते.

**दिल्लीतून विनंती अन् फडणवीसांचा होकार; अगदी अंतिम क्षणी उपमुख्यमंत्री होण्याचा निर्णय**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्याच्या नेतृत्वाची धुरा शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे सांभाळणार आहेत. एकनाथ शिंदे हे राज्याच्या नवे मुख्यमंत्री असतील, भाजपा पक्षाचा या सरकारला पाठिंबा असेल, अशी घोषणा भापजा नेते देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली आहे. ही घोषणा करताना मी या सरकारचा भाग नसेन, मात्र या सरकारची माझ्यावर जबाबदारी असेन, असेही फडणवीस यांनी जाहीर केले होते. मात्र फडणवीसांच्या या घोषणेनंतर भाजपच्या दिल्लीमधील शीर्ष नेतृत्वाने वेगळी भूमिका मांडली आहे. देवेंद्र फडणवीस राज्याचे उपमुख्यमंत्री होतील, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जाहीर केले आहे.
शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. याआधी आज फक्त एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील असे सांगण्यात आले होते. तसेच मी या सरकारमध्ये प्रत्यक्ष सहभागी नसेन, असे फडणवीस यांनी सांगितले होते. मात्र भाजपाचे केंद्रीय नेते अमित शाह आणि जेपी नड्डा यांनी फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री होऊन राज्यात सहभागी व्हावे अशी विनंती केली. या विनंतीनंतर फडणवीसांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यासा होकार दिला आहे. आज एकनाथ शिंदे यांच्यासोबतच फडणवीस यांचादेखील शपथविधी झाला.



# अग्निवीर भाजप कार्यकर्ते, त्यांना नोकऱ्या का द्यायच्या?

## ममता बॅनर्जी यांचा केंद्र सरकारला सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता :** अग्निवीर हे भाजप कार्यकर्ते असल्याचा खळबळजनक उल्लेख पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे. या भाजप कार्यकर्त्यांना राज्यांनी नोकऱ्या का द्यायच्या असा सवाल ममता बॅनर्जी यांनी केला. सेना दलांमध्ये अग्निवीरांची चार वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर त्यांना राज्यांनी नोकऱ्या उपलब्ध करून द्याव्यात असे पत्र केंद्राने राज्यांना पाठविले होते. त्या अनुषंगाने ममता बॅनर्जी यांनी ही प्रतिक्रिया व्यक्त केली. त्या म्हणाल्या की भाजप कार्यकर्त्यांना आम्ही नोकऱ्या का द्यायच्या ? त्यापेक्षा आमच्या राज्यातील युवकांना नोकऱ्यांमध्ये राज्य सरकार प्राधान्य देईल. त्यांनी म्हटले आहे की, सैन्यदलामध्ये केंद्र सरकार अग्निवीरांना फक्त चार वर्षे सेवा बजावण्याची संधी देणार आहे. त्यानंतर या अग्निवीरांना नोकऱ्या देण्याची जबाबदारी केंद्र सरकार राज्यांवर ढकलणार हे योग्य नाही. नोकरीची गरज असलेल्या युवकांची पश्चिम बंगालमध्ये कमतरता नाही. आम्ही या युवकांचा नोकऱ्यांसाठी प्राधान्याने विचार करू. निवडणुकांपर्यंतच अग्निपथ योजना २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकांपर्यंतच अग्निपथ योजना केंद्र सरकारकडून राबविली जाईल असा दावा ममता बॅनर्जी यांनी केला. अग्निपथ योजना विरोधात देशभरात निदर्शने झाली होती. काही ठिकाणी या निदर्शनांना हिंसक वळण लागले होते. अग्निपथ योजनेबाबत विरोधकांनीही चिंता व्यक्त केली होती. मात्र अग्निवीरांनी चार वर्षे सेनादलात सेवा बजावल्यानंतर त्यांना नोकऱ्या देण्याची तयारी भाजपची सत्ता असलेल्या हरयाणा, उत्तर प्रदेश सारख्या राज्यांनी दाखविली आहे.

# अमरनाथ यात्रेवर हल्ल्याचे सावट

आधुनिक केसरी न्यूज

**जम्मू :** काल राजस्थानच्या उदयपूरमध्ये एका शिंप्याची दुकानात घुसून निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्याच्या हत्येनंतर देशात दहशतवादी कारवायांबाबत सरकार अलर्ट मोडवर आहे. यातच, यंदाच्या अमरनाथ यात्रेवरही संकट येऊ शकते, असे इनपूट मिळाल्याची माहिती आहे. 3,888 मीटर उंचीवर असलेल्या बाबा अमरनाथ यात्रेला 'स्टिकी' बॉम्बचा धोका असल्याचे सांगितले जात आहे.

# भूस्खलनात लष्कराची छावणी उद्ध्वस्त

## ५५ जवान ढिगाऱ्याखाली अडकले, मृतांचा आकडा वाढण्याची भीती

आधुनिक केसरी न्यूज

**इंफाळ :** मणिपूरमधील नोनी जिल्हात सुरु असलेल्या संततधार पावसाने जिरिबाम- इंफाळ रेल्वे-रूळाजवळ भूस्खलन झाले आहे. दुर्घटनास्थळील लष्कराची छावणी असल्याने त्याचा मोठा फळका बसला आहे. लष्कराच्या छावणीजवळ झालेल्या भूस्खलनात ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ५० हून अधिक जवान बेपत्ता आहेत. आत्तापर्यंत १३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरू असून जखमींवर नोनी आर्मी मेडिकल युनिटमध्ये उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेत मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.
जिरीबामला इंफाळशी जोडण्यासाठी रेल्वे मार्ग तयार करण्यात येत आहे. त्याच्या सुरक्षेसाठी १०७ टेरिटोरियल आर्मीचे जवान तैनात करण्यात आले होते. बुधवारी रात्री येथे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले. यानंतर गुरुवारी सकाळी लष्कर, आसाम रायफल्स, मणिपूर पोलिसांकडून मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू करण्यात आले.




**बचावकार्य सुरू**

मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाल्यामुळे नदीचा प्रवाह थांबवण्यात आला आहे. भारतीय लष्कर आणि आसाम रायफलच्या मदतीने मोठ्या प्रमाणात बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. बेपत्ता झालेल्या जवानांचा शोध घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करण्यात येत आहे. पहाटे ५. ३० वाजेपर्यंत १३ जणांची सुटका करण्यात आली. जखमींवर नोनी आर्मी मेडिकल युनिटमध्ये उपचार सुरू आहेत. दरड कोसळल्याने इजई नदीच्या प्रवाहावर परिणाम झाला आहे. भूस्खलन आणि खराब हवामानामुळे बचाव कार्यात अडथळे येत आहेत. मात्र, बेपत्ता लोकांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले जात आहेत. लष्कराचे हेलिकॉप्टर बचावासाठी सज्ज असून हवामान स्वच्छ होण्याची वाट पाहत आहेत. मणिपूरमध्ये गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे.

**जखमी जवानांना रुग्णालयात दाखल**

गंभीर जखमीं जवानांना उपचारासाठी नोनी आर्मी मेडिकल युनिटमध्ये दाखल करण्यात आले आहे.
मिळालेल्या माहितीनुसार जिरीबामला इंफाळशी जोडण्यासाठी रेल्वे मार्ग तयार केला जात होता. . त्याच्या सुरक्षेसाठी टेरिटोरियल आर्मीचे १०७ जवान तैनात करण्यात आले होते. मात्र, बुधवारी मुसळधार पावसामुळे जवानांच्या कॅम्पला भुस्खलनाचा फटका बसला आणि जवानांचा कॅम्प उद्वस्थ झाला.
पावासामुळे बचावकार्यात अडथळा या घटनेची माहिती मिळताच लष्कर, आसाम रायफल्स, मणिपूर पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू केले. मात्र, पावसामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण होत आहेत. ह्रॅलिकॉप्टरद्वारे जखमी जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# मनोरथा चल त्या नगरीला...!

आधुनिक केसरी

नक्षीकाम केलेलेआणि अलंकारांनी सुशोभित केलेले शंभर दगडी खांब आहेत. अलंकृत असा भव्य नंदी आहे. त्यावर आरूढ अशी गिरिजाशंकराची मूर्ती आहे. राम, विष्णू आणि भगवान शंकरांच्या अवतारांच्या अनेक कथा कोरीव कामातील शिल्पातून साकार झाल्या आहेत. या परिसरात मंद स्वरात दाक्षिणात्य पद्धतीचे सनई चौघड्याचे छान संगीत ऐकायला येते. पूर्वेकडील गोपुरातून आतमध्ये प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला एका कोपऱ्यात अत्यंत सुशोभित असा एक गजराज आपल्याला दर्शन देतो. अनेक भाविक त्याची पूजा करतात. विजय चौकात एक भव्य उंच चौथरा आपल्या दृष्टीस पडतो. याला राज्याभिषेक चौथरा असे म्हटले जाते. या राज्याभिषेक चौथऱ्याच्या बाजूला असलेल्या भिंतीवर सुंदर दृश्ये कोरलेली आपल्याला दृष्टीस पडतात. त्याला लागूनच दोन मजली भव्य हॉल आहे. राजघराण्यातील स्त्रियांना येथून राज्याभिषेक सोहळा पाहता येत असे. राजघराण्यातील स्त्रियांना राहण्यासाठी एका भव्य प्रसादाची निर्मिती केली गेली होती. त्याला झेनाना तटबंदी असे म्हणतात. या वास्तूच्या सरळ रेषेतील कमानी अत्यंत आकर्षक पद्धतीने बांधलेल्या आहेत. यात आपल्याला हिंदू आणि मुस्लिम संस्कृतीच्या वास्तुकलेचा मिलाफ बघायला मिळतो. जवळच कमळाच्या आकाराचा लोटस पॅलेस आजही उत्तम स्थितीत पाहायला मिळतो. राजघराण्यातील स्त्रियांचे अंघोळीचे ठिकाण म्हणजेच हमामखाना ही सुद्धा अशीच भव्य आणि सुंदर वास्तू. हत्तींना ठेवण्यासाठी एका विशाल अशा जागेची निर्मिती करण्यात आली होती. याच परिसरात एक गणपतीचे मंदिर आहे. त्याला सासवकेलू असे म्हणतात. ही मूर्ती मोहरीच्या दाण्यासारख्या दगडापासून बनवलेली आहे तर मुर्तीसमोरचा मूषक वेगळ्या दगडातून घडवलेला आहे. हजारा राम मंदिर हे हिंदू वास्तू पद्धतीने बांधलेले सुंदर मंदिर आहे. या ठिकाणी राजे पूजा करीत. या मंदिराच्या भिंतीवर रामायण, महाभारतातील अनेक प्रसंग कोरलेले दिसतात. विठ्ठल मंदिर हे हंपीतील भव्य आणि देखण्या मंदिरांपैकी एक. यालाच विजय विठ्ठल मंदिर म्हटले जाते. आता या मंदिराची दुरुस्ती सुरु आहे. या मंदिरात जाण्यासाठी आता बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांची व्यवस्था केली आहे.



# आनंदी पहाट

## व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी मुलांचे सामाजिकीकरण करावे

आधुनिक केसरी

चांगल्या पालकत्वामध्ये मोठ्या प्रमाणात सातत्य आणि दिनचर्या यांचा समावेश होतो, ज्यामुळे मुलांना नियंत्रणाची भावना मिळते; म्हणजे अपेक्षा, शिस्त आणि लवचिकता निर्माण करण्याच्या रणनीती आणि मुलांचे विकासाचे वय यांच्याबाबतीत अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी मुलांचे सामाजिकीकरण करणे हे चांगले पालकत्वाचे उद्दिष्ट आहे. सदोष पालकत्व तेव्हा घडते, जेव्हा पालक त्यांच्या मुलांच्या सर्वोत्तम हितापेक्षा त्यांच्या स्वतःच्या आवडींना प्राधान्य देतात. काही पालक असे निर्णय घेतात, कि जे त्यांच्या मुलांच्या हिताचे नसतात. याचा अर्थ असा नाही की, चांगले पालक होण्यासाठी तुम्ही तुमच्या मुलाच्या गरजा नेहमी तुमच्यापेक्षा जास्त ठेवाव्यात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पालक म्हणून, तुम्ही तुमच्या मुलाच्या मूलभूत मूल्यांवर, जसे की धार्मिक मूल्ये आणि त्यांच्या भविष्याशी संबंधित समस्या, जसे की शैक्षणिक निवडींवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत असता. तुमचे तुमच्या मुलाशी असलेले नाते जितके मजबूत असेल तितका तुमचा प्रभाव जास्त असेल, कारण तुमचे मूल तुमचे मार्गदर्शन घेईल आणि तुमच्या मताची आणि समर्थनाची कदर करेल. सर्वात सामान्य पालकांच्या शैलींमध्ये हुकूमशाही, अधिकृत, अनुज्ञेय, असह्य, संलग्नक आणि सकारात्मक यांचा समावेश होतो. कौटुंबिक समुपदेशक पालकत्वाच्या शैलींना तीन श्रेणींमध्ये विभाजित करतात; "हुकूमशाही" (पालकांना माहीत असलेला सर्वोत्तम दृष्टीकोन जो आज्ञाधारकतेवर जोर देतो), "अनुज्ञेय" (जे काही वर्तणूक मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करते, कारण पालकांना त्यांच्या मुलांना नाराज करायचे नसते) आणि "अधिकृत" (जे रचना आणि सुसंगत ह्याच्याशी संबंधित असते).



आधुनिक केसरी

## चंद्रभागा नेत्री | वाहू लागे ||

करावा विचार | विवेक बुध्दीने ||
विकारी मनाने | घात होई ||१||

अंतरीचा भाव | शुद्ध तो असावा ||
तेथेची विसावा | देव घेतो ||२||

कर्मांचिया ठायी | पापपुण्य गाठी ||
तो हा जगजेठी | पाहतसे ||३||

देखिता चरण | उजळल्या रात्री ||
चंद्रभागा नेत्री | वाहू लागे ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**कर्मायत्तं फलं पुंसां बुद्धिः कर्मानुसारिणी।**
**तथाऽपि सुधिया भाव्यं सुविचार्यैव कुर्वता।।**

**अर्थ :** कर्मानुसारच फलप्राप्ती होते. बुद्धी देखील कर्मानुसार व्यवहार करते. तरीही बुद्धिमान व्यक्ती सारासार विचार करूनच कार्य करत असतो. ''प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः'' म्हणजे प्रारब्ध कर्म भोगूनच नाहीसे होतात, या उक्तीनुसार कर्माचे महत्व आहे. तेव्हा सारासार विचार करूनच कार्य करायला हवे, असे प्रतिपादन येथे भर्तृहरींनी केले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## ब्रह्मपावन निरूपण

आधुनिक केसरी

पण असा अनुभव येण्यासाठी पुनःपनः विवेकाचा ध्यास धरावा लागतो. निर्गुण निराकार परमात्म तत्वाशी एकरूप होऊन आत्मज्ञानाने स्वसंन्मानीत व्हायला हवे. स्वस्वरूपाच्या अनुसंधानात जीव तरतो. संधानाच्या मागें मागें रहाणे म्हणजे अनुसंधान होय.
स्वस्वरूप किंवा आत्मस्वरूप हे आपले संधान होय.त्याच्या सतत मागे मागे रहाणे म्हणजे अनुसंधान होय. सतत नामस्मरणात रहाणे चिंतन करणे,मनामध्ये सतत तदाकार भावनेने एकरूप होणे. सतत प्रयत्न वाढवत रहाणें. सततच्या चिंतनाने मन तदाकार होते आणि " मी आत्मस्वरूप आहे"असा साक्षात्कार होतो.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

**आत्मनिवेदन**

आपण स्वतः ला स्वस्वरूपांत लीन करावे. विवेकाने अभ्यासपूर्वक आपण स्वस्वरूपाहून वेगळे उरूचं नये. स्वस्वरूपाच्या लीन होण्याच्या या अवस्थेला "आत्मनिवेदन" म्हणतात. प्रथम अध्यात्म श्रवण करावे. मग श्री गुरूचरणाशी सेवा करावी. ती सेवा एवढी निराभिमानी,निरंतर असावी. की परमात्मा तुमच्यात एकरूप होईल. सद्गुरूच्या सहाय्याने "आत्मनिवेदन" साधावे.एकदा का आत्मनिवेदन साधले गेले की निव्वळ शाश्वत आत्मवस्तु तेवढी शिल्लक रहाते. आणि मी व आत्मा एकच आहोत असे ज्ञान होते. श्रवण, निदिध्यास, मनन, साक्षात्कार ही चार पायऱ्यांची उपनिशदसिद्ध परमार्थ साधनाच श्री समर्थांनी सांगितली आहे. अशाप्रकारे आत्मज्ञानाने जीव ब्रम्हस्वरूप होतो त्याचे संसारातील दुःख नाहीसें होते. पराकोटीची साधना फलद्रुप झाल्यावर हा नश्वर देह प्रारब्धावर सोडून तो मनाने स्वस्थ रहातो.ज्ञानाची काय किंवा अज्ञानाची काय जीवनयात्रा प्रारब्धगतीने चालते. आत्मज्ञानी जीवाला तें समजते. अज्ञानी जीवाला कळत नाही. म्हणून तर ज्ञान झाल्यावर ज्ञानी जीव (याठिकाणी मी स्त्री,व पुरूष) या अर्थाने जीव हा शब्द वापरला आहे हे वाचकांच्या लक्षात आले असेलचं. ज्ञान मिळाल्यावर जीव प्रारब्दाच्या स्वाधीन करतो. समर्थ यालाच आत्मज्ञान म्हणतात. आत्मज्ञानाने समाधान मिळते. जीव परब्रम्हात विलीन होऊन एकरूप होतो. तो खरा भक्त बनतो. आता जे व्हायचे आहे ते होऊ दे जे जायचे आहे ते जाऊ दे,अशी मनाची निर्भय व निश्चित अवस्था होते. जन्ममरणाचे भयच मुळी मनातून नाहिसे होते.संतांच्या संगतीचा लाभ झाला म्हणजे मुख्य देवाची ओळख होते. ती एकदा का झाली की देव व भक्त एकरूप होतात. समास अवघड आहे मला समजला तसा मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे . लिखाण करत असताना काही कमीजास्त झाले तर समर्थ क्षमा करतील अशी अपेक्षा करते. वाचकांनीही समजून घ्यावे या अपेक्षेने हा "ब्रम्हपावननिरूपण" समास दुसरा समाप्त करते.

# "हार्टअटॅक अणि विठ्ठल"

आधुनिक केसरी

चातुर्मासात संपूर्ण महाराष्ट्रात "विठ्ठल" पुजला जातो. विठ्ठलाचे दोन्ही हात कटीवर म्हणजे कमरेवर आहेत. पंढरपुरची, विठ्ठलाची मूर्ति नीट बघतली तर हाताचे पंजे वरील बाजूस आहेत. नीट वैद्यकीय दृष्टया निरिक्षण केले तर उजवा तळहात लिव्हरवर अणि डावा तळहात स्प्लीनवर आहे. शरीराच्या चुंबकिय शास्त्राचा विचार करता उजवा हात म्हणजे दक्षिण ध्रुव अणि डावा हात म्हणजे उत्तर ध्रुव. पोटात गॅसेस होवून ते छातीत जाऊ लागले की छातीत दुखते व त्यातून हार्ट अटॅक येण्याची शक्यता असते. अशावेळी विठ्ठलासारखे दोन्ही बरगड्याखाली हात ठेवल्यास गँसेस लिव्हरकड़े येतात अणि बाहेर पडतात. छातीत शिरत नाहीत. तसेच "WARD VIBRATION THERAPY" चा विचार करता 'ट' अणि 'ठ' ही अक्षरे अनुस्वार देवून म्हटली की हार्टचे संरक्षण होते. अणि विठ्ठल म्हणताना ठ डबल आहे. म्हणून छातीत दुखु लागले किंवा प्रेशर



आले की विठ्ठल विठ्ठल म्हणावे. म्हणजे ५-१० मिनिटात रिलीफ मिळतो.
एके ठिकाणी आलेला अनुभव. एका स्नेही व्यक्तीची काही वर्षांपूर्वी ओपन हार्ट सर्जरी झाली होती. एके दिवशी रात्री छातीत जबरदस्त दुखायला लागले. पुन्हा ऍड्मिट व्हायच्या भीतीने त्यांनी कुणालाच सांगितले नाही. त्यांच्या व्यायाम वर्गातील एका मित्राने सांगितल्यानुसार ते उठून बाल्कनीत गेले, विठ्ठलासारखे दोन्ही बरगड्याखाली हात ठेवून उभा राहिले अणि 'जय हरी विठ्ठल' म्हणायला लागले. पाच मिनिटात जोरदार गॅसेस सुटले अणि छातीत दुखणे थांबले. नंतर पुन्हा छातीत दुखले नाही.
अगदी असाच त्रास माझ्या आईला होत असे. एके दिवशी रात्री आम्ही गाढ झोपेत असताना तिच्या छातीत दुखायला लागले. काही दिवसांआधीच तिच्या मैत्रिणींने, छातीत दुखले तर ट अणि ठ ही अक्षरे अनुस्वार देवून म्हण असे सांगितले होते.
आईने विचारले ही अक्षरे लक्षात कशी राहणार? त्यावर तिची मैत्रिण म्हणाली 'फक्त विठ्ठल विठ्ठल म्हण". ही चर्चा येथे संपली. दोनच दिवसानी आईला त्रास व्हायला लागला. त्यावेळी आम्हा कुणालाही काही न सांगता आई शांतपणे उभी राहिली आणि नुसते 'विठ्ठल विठ्ठल' म्हणू लागली अणि थोड्यावेळाने छातीत दुखणे थांबले. काही दिवसांनी मी आईच्या मैत्रिणीशी बोलले, तेव्हा त्या म्हणाल्या पुन्हा जर तुझ्या आईला त्रास होऊ लागला तर लिव्हरवर मॅग्नेटचा दक्षिण ध्रुव अणि स्प्लीनवर उत्तर ध्रुव लाव आणि तिला अपानवायु मुद्रा करायला सांग. तोंडाने जय हरी विठ्ठल म्हणायला सांग. फक्त तिनेच नाही, कोणत्याही वयाच्या व्यक्तीला असा त्रास झाला तर तेच करून बघा.
महाराष्ट्रात आषाढ महिना हा भरपूर पावसाचा असतो. त्यामुळे पचनशक्ति मंदावते, गैसेस होतात. म्हणून पंढरीची वारी. म्हणजे विठ्ठल नामाचा गजर. आपले पूर्वज किती बुद्धिमान होते ह्याचा विचार करा - राम, कृष्ण, विठ्ठल, व्यंकटेश ही सर्व विष्णुचीच रुपे पण महाराष्ट्रातील हवामानानुसार दैवत विठ्ठल. सामान्यांचे सहज आरोग्य त्याच्या नावाने राखले जात असे. कितीतरी अंतर चालून गेल्याने देहात विलक्षण चैतन्य खेळत असे, शिवाय गॅस, अपचन, ऍसिडिटी, अनिद्रा, OVERWEIGHT असले रोग जवळपास भटकत देखील नसत.



# तीन तासांच्या थरारानंतर घरात घुसलेला बिबट्या अखेर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संरक्षण भिंत ओलांडून बिबट्या चक्क घरात घुसल्याची घटना चंद्रपूर मधील सावली वनपरिक्षेत्रात येणाऱ्या पाथरी येथे आज (गुरुवार) पहाटे घडली. दरम्यान, सावली येथील विभागाच्या चमूने तीन तास रेस्क्यू ऑपरेशन करून त्या बिबट्याला जेरबंद केले.

पाथरी येथील गोपाळ पाटील ठीकरे यांच्या घरामागे मोठे जंगल आहे. गुरुवारी त्यांचे कुटुंबीय गाढ झोपेत असताना अचानक बिबट्याने घरात प्रवेश केला. घरात बिबट घुसल्याची माहिती होताच मोठी तारांबळ उडाली. बिबट्या घरात घुसल्याची बाब गावात वाऱ्यासारखी पसरली. बिबट्याला बघण्यासाठी गावातील लोकांनी गर्दी केली. दरम्यान, सावली येथील वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना तसेच पाथरी पोलीस स्टेशनच्या पथकाला याबाबत माहिती देण्यात आली. दरबान पाथरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश मोहोळ व सावली येथील वन विभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी कांबळी व त्यांची चमू ठिकरे यांच्या घरी दाखल झाले. त्यांनी घरातील सर्व मार्ग बंद करून एका मार्गावर पिंजरा लावून रेस्क्यू ऑपरेशन केले. तीन तासाच्या अथक परिश्रमानंतर बिबटला जेरबंद करण्यात यश आले.

# महाबळेश्वर पाचगणी येथे इंधनावरील वाहनांवर कोणतीही बंदी नाही : पल्लवी पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** महाबळेश्वर येथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना विद्युत वाहन असणे बंधनकारक नाही. इंधनावरील वाहनांवर कोणतीही बंदी घातलेली नाही असे महाबळेश्वर गिरीस्थान पालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी भोरे पाटील यांनी पत्रकारांना सांगितले. महाबळेश्वर पाचगणी येथे पर्यटक इंधनावरील वाहने घेऊन येतील. मात्र त्यांना त्यांची वाहने हॉटेल, पालिका व खाजगी वाहनतळावर उभी करून फक्त विद्युत वाहन वाहनाचा वापर करूनच मधूनच पर्यटनाचा आनंद घ्यावा लागणार आहे. जर स्वतःचे विद्युत वाहन असेल तर त्यांना पर्यटनाचा आनंद घेता येईल. येथे पर्यटकांच्या इंधनावरील खासगी वाहनावर बंदी येणार आहे यापुढे पर्यटकांना निसर्गाचा आनंद घेण्यासाठी फक्त विद्युत गाडीचा वापर करावा लागेल. तसा प्रस्ताव या दोन्ही पालिकांनी तयार करून तो अंतिम मंजुरीसाठी पर्यटन मंत्रालयात पोहोचला आहे अशा बातम्या सर्वत्र प्रसिद्ध झाल्यावर पर्यटक, हॉटेल व्यवसायिक,स्थानीक टँक्सी मोटार चालक मालक संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे या निर्णयाचा पर्यटनावर मोठा परिणाम होईल अशा तक्रारी पालिकेकडे करण्यात आल्या. महाबळेश्वर, पाचगणी येथे येणाऱ्या शेकडो इंधनावरील वाहनांमुळे वाहतूक कोंडी तर होतेच परंतु यामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे निसर्गाला धोका निर्माण झाला आहे यामुळे पर्यटन विभागाने नाराजी व्यक्त करत येथील निसर्ग वाचविण्याच्या प्राधान्य देण्याच्या सूचना पालिकेला दिल्या आहेत. यामुळे पालिका स्तरावर विद्युत वाहनाचा पर्याय दिल्याचा निर्णय होण्याची शक्यता असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्याने पर्यटक व इतरांनी या बाबत नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे विविध समाज माध्यमे व वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले पर्यटकांना विद्युत वाहन आवश्यक हे वृत्त निराधार असल्याची माहिती महाबळेश्वर गिरीस्थान पालिकेच्या मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांनी दिली.

# पुणे - नाशिक सेमी हायस्पीड प्रकल्पासाठी ३० हेक्टर भूसंपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** रेल्वे मंत्रालयाने पुणे – नाशिक मार्गावर वेगवान प्रवासासाठी सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला असून या प्रकल्पासाठी आवश्यक १,४५० हेक्टरपैकी ३० हेक्टर खासगी जागा संपादन करण्यात आल्याची माहिती 'महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन लिमिटेड'कडून (एमआरआयडीसीएल) देण्यात आली. तसेच सरकारी आणि वन जमीन संपादनाचीही प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, निती आयोगाच्या मंजुरीनंतर हा प्रकल्प अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाकडे सादर करण्यात आला आहे. पुणे – नाशिक असा थेट मार्ग नसल्याने पुणे किंवा नाशिक गाठण्यासाठी मुंबईला येऊन रेल्वे पकडावी लागते. त्यामुळे प्रवासासाठी सहा तास किंवा त्यापेक्षा जास्त वेळ लागतो. प्रवास वेळ कमी करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने सेमी हायस्पीड संकल्पना अंमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. ही मार्गिका पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांतून जाणार आहे. त्यासाठी १०२ गावांमधील एक हजार ४५० हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. भूसंपादन आणि संरेखनासाठी संयुक्त मोजमाप सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. यामध्ये सरकारी आणि वन जमिनीचाही समावेश आहे. आतापर्यंत ३० हेक्टर खासगी जागा संपादित करण्यात आली असून ही प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राबविली जात आहे. त्यासाठी प्रकल्पग्रस्तांना मोबदलाही देण्यात येत आहे. एप्रिलमध्ये या प्रकल्पाला निती आयोगाने मंजुरी दिली आहे. आता केंद्रीय मंत्रिमंडळाकडून लवकरच अंतिम मंजुरीही मिळेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.



# लोणार काँग्रेसकडून एकदिवसीय धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या अग्निपथ या हंगामी सैन्यभरती योजनेबद्दल संपूर्ण देशात युवकांकडून रोष व्यक्त केला जात आहे. यामध्ये भरती होणाऱ्या सैनिकांना ४ वर्षाच्या सेवेनंतर नोकरीची कोणतीही शास्वती राहणार नाही तसेच त्यांना पेन्शन देखील दिली जाणार नाही.

या योजनेअंतर्गत भरती झालेल्या फक्त २५% तरुणांना स्थायी सेवेत संधी दिली जाईल. ४ वर्षाची सेवा पूर्ण करून सैन्यातून बाहेर पडणाऱ्या उर्वरित तब्बल ७५% तरुणांना नेमका कोणत्या क्षेत्रात आणि कोणत्या स्वरूपाच्या संधी उपलब्ध असणार आहेत याबद्दल कोणतेही स्पष्टता नाही. ३० ते ४० हजार रुपये वेतन व प्रत्येक वर्षी वेतन काहीअंशी वाढ करण्यात येईल. त्यातही मासिक वेतनातील ३०% रक्कम अग्निपथ समूहात जमा करावी लागणार आहे. हीच रक्कम ४ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर सेवा निधी अंतर्गत सुमारे १२ लाख रुपये मिळणार आहेत याचा अर्थ हे तुलनेत तोकडी रक्कम घेऊन पुढील आयुष्याची वाटचाल करावी लागणार आहे किंवा मिळेल ते काम परत करावे लागणार आहे. यामुळे लष्करात भरती होऊ इच्छिणारे आणि त्यासाठी गेल्या काही वर्षापासून तयारी करत असलेले तरुण निराश व हताश झालेले आहेत. अनेक निवृत्त सैन्याधिकारी व माजी सैनिक यांनी या योजनेच्या विरोध करीत आहेत या साठी लोणार तालुका शहर काँग्रेस व युवक काँग्रेसच्या वतीने एक दिवसीय तहसील कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी काँग्रेस चे तालुका अध्यक्ष राजेश मापारी, शहर अध्यक्ष नितीन शिंदे, काँग्रेस चे जेष्ठ नेते साहेबराव पाटोळे, प्रकाश धुमाळ, नगरपरिषद उपाध्यक्ष बादशाह खान, आरोग्य सभापती संतोष मापारी, युवक चे जिल्हाध्यक्ष अनिकेत मापारी, तालुका उपाध्यक्ष सतिष राठोड, मा.न.प.उपाध्यक्ष शेख समद शेख अहमद, संतोष डोळे, पंढरी चाटे, रामचंद्र कोचर, शेख सजाद, मोसीन शहा, सागर डागर, ओम पाटोळे, अमोल सोनुने, शेख जुनेद, अमोल मापारी, विनायक मापारी, शेख अजमत शेख अनामत, देवराव पन्हाळ, गणेश घायाळ, गोविंदा मोरे, शिवराज मापारी, गणेश सपकाळ, अक्षय शिंदे, गणेश काळे, शिवशंकर मापारी आदी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# औरंगाबाद विमानतळावर बॉम्ब थ्रेड मॉक ड्रिल



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बुधवारी सकाळी साडेअकरा वाजता औरंगाबाद विमानतळावर बॉम्ब थ्रेड मॉक ड्रिल करून सुरक्षा तपासणी करण्यात आली. सुरक्षा व्यवस्था योग्य असल्याचे आढळून आल्याचा दावा करण्यात आला असून संबंधित सुरक्षा कर्मचारी व इतर पथकांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेवर पार पाडल्या. माहिती मिळताच विमानतळ प्रशासनाने टर्मिनलमध्ये उपस्थित असलेल्या सर्व प्रवाशांना बाहेर काढले.

स्थानिक विमानतळ स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या बॉम्ब थ्रेड समितीचे सदस्य घटनास्थळी पोहोचले. तपासादरम्यान, फ्लाय बिग एअरलाइनच्या चेक-इन काउंटर क्रमांक 09-10 च्या मध्ये एक संशयास्पद बॅगसारखी वस्तू आढळून आली. बॉम्ब निकामी पथकाच्या सदस्यांनी तीची निकामी करण्याची प्रक्रिया सुरू केली. बॉम्बच्या माहितीपासून ते बॉम्बचा शोध आणि निष्क्रिय करण्यापर्यंतचे काम 67 मिनिटांत पूर्ण झाले.

विमानतळ प्रशासनाला साडेअकरा वाजता विमानतळ टर्मिनलमध्ये बॉम्ब ठेवल्याची माहिती मिळाली. लगेच ही माहिती बॉम्ब थ्रेड आढावा समितीच्या सदस्यांना देण्यात आली. अवघ्या चार मिनिटांत माहितीची प्रक्रिया पूर्ण केल्याने टर्मिनलमध्ये उपस्थित प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात यश आले. वैद्यकीय पथक, विमानतळ सुरक्षा दल, अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. स्थानिक पोलिसांचे बीडीडीएस पथकही पोहोचले. यानंतर बॉम्ब शोधून निकामी करण्याची कारवाई करण्यात आली. तथापि, बीडीडीएस टीम येण्यापूर्वीच विमानतळ सुरक्षा एपीएसयू येथे तैनात सीआयएसएफच्या बीडीडीएस आणि श्वान पथकाला संशयास्पद वस्तू सापडली होती, नंतर स्थानिक पोलिसांच्या बीडीडीएस पथकानेही शोध मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी डेप्युटी कमांडंट पवन कुमार आणि विमानतळ संचालक डी.जी. साळवे म्हणाले की, बॉम्ब इत्यादी धोक्यापासून विमानतळाचे संरक्षण करण्यासाठी नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने बॉम्ब थ्रेट आकस्मिक योजना तयार केली आहे. या अंतर्गत देशातील सर्व विमानतळांवर बॉम्ब थ्रेट रिव्ह्यू समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

ज्यामध्ये एसपी सिटी, एडीएम सिटी, फायर ब्रिगेड, वैद्यकीय सेवा, बॉम्ब डिस्पोजल युनिट, एपीएसयू इत्यादी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. सर्वांना अलर्ट मोडमध्ये ठेवण्यात आले आहे. अशा कोणत्याही माहितीवर, पथक अधिकारी त्यांच्या अधीनस्थांसह पोहोचतात आणि बॉम्ब शोधण्याची आणि निकामी करण्याची कारवाई करतात. सुरक्षा तपासणीसाठी वर्षातून एकदा मॉक ड्रिल घेण्यात येते आणि संबंधित सदस्यांची क्रियाकलाप तपासली जाते.

|| उठावणा ||



स्वातंत्रसैनिक व जेष्ठविधिज्ञ
स्व. काशीनाथजी नावंदर

इनका दु:खद निधन दि.२९-०६-२०२२ बुधवार को हुआ। जिनका उठावना आज शुक्रवार दि. ०१-०७-२०२२ को दोपहर ३.०० बजे हमारे निजी निवास स्थान पर है।

शोक बैठक : प्रती दीन दोपहर ४.०० से शाम ६.०० बजे

स्थान : हॉटेल नंदनवन के पीछे, रचनाकार कॉलनी

शोकाकुल

चंद्रकिशोर (भाई), विकास (पुत्र), सुनिल, अशुतोष, ॲड.मनीष, ॲड. पराग, वैभव, अमीत, कुणाल (भतीजे), ॲड.मेहुल, राहुल (पोते), एकांश (पंतू)

एवं संपुर्ण नावंदर परिवार, औरंगाबाद गंगापुर

# खिशावर बोजा ?

आधुनिक केसरी

आजपासून देशात अनेक नियम आणि कायदे बदलणार आहेत. हे नियम तुमच्या आर्थिक व्यवहाराशी निगडीत असतील. या नियमांच्या अंमलबजावणीनंतर काही बोजा तुमच्या खिशावरही पडू शकतो. व्यवहारांसाठी क्रेडिट आणि डेबिट कार्ड वापरणारे, क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करणारे आणि पॅन कार्ड धारकांनाही या बदलांमध्ये समाविष्ट केले जाईल. अशा परिस्थितीत प्रत्येकाला या नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास आर्थिक नुकसानही सहन करावे लागू शकते. व्यवसायांकडून मिळालेल्या भेटवस्तूंवर १० टक्के दराने कर वजावट केली जाईल. हा कर सोशल मीडियावर प्रभाव टाकणारे आणि डॉक्टरांवर लागू होणार आहे. सोशल मीडियावर प्रभाव टाकणाऱ्यांना कंपनीच्या वतीने मार्केटिंगसाठी दिलेली उत्पादने ठेवताना त्यांना टीडीएस भरावा लागेल. दुसरीकडे, दिलेले उत्पादन कंपनीला परत केल्यास, टीडीएस लागू होणार नाही. पेमेंट गेटवे, व्यापारी, पेमेंट एग्रीगेटर आणि अॅक्वायरिंग बँकांना ग्राहक कार्ड तपशील जतन करण्यावर बंदी घालण्यात येणार आहे. बँक ग्राहकांची सुरक्षितता लक्षात घेऊन, भारतीय रिझर्व्ह बँकेने १ जुलै २०२२ पासून डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड व्यवहारांमध्ये कार्ड टोकनायझेशन वापरण्याची तरतूद केली आहे. टोकनसह कार्ड वर्णन बदलण्याला टोकनायझेशन म्हणतात, जी कार्ड व्यवहारांची सुरक्षित पद्धत मानली जाते. हा नियम लागू झाल्यानंतर ऑनलाइन वस्तूंची विक्री करणाऱ्या कंपन्या त्यांच्या ग्राहकांच्या कार्डचा तपशील त्यांच्याकडे सुरक्षित ठेवू शकणार नाहीत. असे केल्याने सर्वसामान्यांचा डेटा सुरक्षित राहील. आयटी कायद्याच्या नवीन कलम १९४एस अंतर्गत, १ जुलै २०२२ पासून, क्रिप्टोकरन्सीसाठी वर्षभरात १०,००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहार झाल्यास एक टक्का शुल्क आकारला जाईल. आयकर विभागाने व्हर्च्युअल डिजिटल मालमत्तासाठी टीडीएसचे प्रकटीकरण मानदंड अधिसूचित केले आहेत. सर्व एनएफटी किंवा डिजिटल चलने त्याच्या कक्षेत येतील. डीमॅट खाते आणि ट्रेडिंग खात्यासाठी केवायसी पूर्ण करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२२ आहे. यापूर्वी, डीमॅट खात्यांसाठी केवायसी अनुपालन ३१ मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. पण नंतर बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने त्याची मुदत वाढवली. डिमॅट खात्यात शेअर्स आणि सिक्युरिटीज ठेवण्याची सुविधा दिल्याची माहिती आहे. अशा परिस्थितीत, जर तुम्ही तुमच्या स्वतःच्या डीमॅट खात्याची आणि ट्रेडिंग खात्याची केवायसी प्रक्रिया ३० जूनपर्यंत पूर्ण केली नाही, तर ३० जूननंतर तुम्हाला समस्यांना सामोरे जावे लागू शकते. पॅन कार्ड आणि आधार कार्डला दंडासह लिंक करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२३ ही सरकारने निश्चित केली आहे. परंतु जर तुम्ही ३० जून २०२२ नंतर म्हणजेच १ जुलै २०२२ नंतर असे केले तर तुम्हाला दुप्पट दंड भरावा लागेल. पॅन आणि आधार लिंक करण्यासाठी ५०० रुपये दंडाची तरतूद आहे, परंतु जर तुम्ही ३० जूनपर्यंत हे काम पूर्ण केले नाही तर १ जुलैपासून तुम्हाला हे कागदपत्रे लिंक करण्यासाठी १,००० रुपये दंड भरावा लागेल. १ जुलैपासून सरकार नवीन कामगार संहिता लागू करू शकते. चार नवीन कामगार संहिता लागू झाल्यानंतर कामगारांच्या कामाचे तास वाढू शकतात, कारण नवीन कामगार संहितेत आठ तासांऐवजी १२ तास काम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांना आठ ऐवजी १२ तास काम करण्यास सांगू शकतात, परंतु त्यांना आठवड्यातून तीन दिवस सुट्टी द्यावी लागेल. नवीन कामगार संहिता लागू झाल्यास कामगारांचे हातातील पगारही कमी होऊ शकतो. नवीन कामगार संहिता लागू झाल्यानंतर कंपन्यांना त्यांच्या कामगारांच्या मूळ वेतनात एकूण पगाराच्या किमान ५० टक्के वाढ करावी लागेल असे केल्याने पीएफ आणि ग्रॅच्युइटीमधील कर्मचाऱ्याचे योगदान वाढेल आणि त्याच्या पगारातून या वस्तूंमध्ये अधिक रक्कम कापली जाईल असे करणे कर्मचाऱ्यांच्या भविष्यासाठी चांगले आहे, परंतु त्यांच्या खात्यात सध्या जमा होणारी पगाराची रक्कम ७ ते १० टक्क्यांनी कमी होऊ शकते.



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

# कर्माचा सिद्धांत

आधुनिक केसरी

**कर्माचा सिद्धांत असे सांगतो की तुम्ही जे कर्म करता त्याचे फळ हे तुम्हाला भोगावेच लागते. गद्दारी चे फळ गद्दारी चा अनुभव देऊनच पूर्ण होते. दगाबाजीचे फळ दगाबाजीच्या रूपातच मिळते व पाठीमध्ये तुम्ही खंजीर खुपसले तर तुमच्याही पाठीत खंजीर खुपसले जाईल. याही ऊपर आता तर शिवसेना व तिचे अस्तित्वच संकटात सापडलेले आहे. आपली खरी शक्ती संघटना ही उद्धव ठाकरेंनी गमावली आहे. हजारो शिवसैनिकांचे परिश्रम व्यर्थ झाले आहे. अट्टाहास नडला आहे. अनुभव, परिपक्वता कमी पडली आहे असे वाटते. कर्माचा सिद्धांत विजयी झाला आहे. दगाबाजीच्या झाडाला दगाबाजीचे फळ आलेले आहे.**

गद्दारीचे फळ गद्दारी, दगाबाजीचे फळ दगाबाजी, पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांच्या पाठीत सुद्धा खंजीरच खूपसल्या गेला अशा पद्धतीच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया आता महाराष्ट्रात उमटत आहेत. साधारणतः अडीच वर्षांपूर्वी विधानसभेच्या झालेल्या निवडणुकांमध्ये जनतेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या युतीला नाकारून भाजपा व शिवसेना युतीला राज्यामध्ये सत्ता स्थापन करण्याची संधी दिलेली होती. परंतु ऐन वेळेस शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्याशी हात मिळवणी केली. वास्तविक पाहता शिवसेना स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणारा पक्ष होता. त्याने आपल्या तत्त्वाशी तडजोड करायला नको होती. परंतु सत्तेसाठी सेनेने तत्त्वांची तडजोड केली आणि भाजपाला परस्पर बाजूला सारले. तसे पाहिले तर हा जनतेच्या भावनांशी केल्या गेलेला खेळच होता. ही लाखो कार्यकर्त्यांची केलेली थट्टाच होती. हा विश्वासघातच होता महाराष्ट्रातील जनतेचा. परंतु "सत्तातुराणां न भयं न लज्जा" म्हणजे सत्तेच्या मोहा पायी कुठलेही भय, लोकलज्जा याचा सेनेने त्याग केलेला होता. त्यामुळे महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. ज्यांनी मुख्यमंत्री बनावे असा जनादेश होता त्यांना विरोधी पक्ष नेता बनावे लागले. अडीच वर्ष महाराष्ट्राच्या जनतेने प्रशासन शून्य अवस्था, निर्णय शून्यता याचा अनुभव घेतलेला आहे. महाराष्ट्र सरकार आहे की नाही हे काही कळत नव्हते. कोरोनाच्या नावाखाली सोयीस्करपणे आपल्या अकार्यक्षमता झाकण्यात आल्या. मुख्यमंत्र्यांवर सामान्य कार्यकर्त्यांनी केलेली टीका त्यांना न आवडून भाजपच्या काही कार्यकर्त्यांना तुरुंगवास सुद्धा सोसावा लागला. आव्हाड यांनी अनंत कोळमकर नावाच्या तरुणाला त्यांच्या बंगल्यात बोलावून त्यांच्या कार्यकर्त्यांकरवी बेदम मारहाण करविली. असे अनेकानेक प्रकरण या सरकारमध्ये घडले. आघाडी सरकारचे दस्तूर खुद्द गृहमंत्री अनिल देशमुख हे खंडणीच्या आरोपाखाली कित्येक महिने झाले तुरूंगामध्ये आहेत तर सामाजिक न्याय मंत्री नवाब मलिक हेसुद्धा तुरूंगामध्ये आहेत. अनेक मंत्र्यांच्या मागे ईडीच्या चौकशीचा ससेमिरा



लागलेला आहे.

भाजपला डावलून ज्या वेळेस शिवसेनेने सरकार स्थापन केले त्यावेळेला महाराष्ट्रातील सर्व दूर जनतेची भावना अशीच झाली होती की भाजपने अडीच अडीच वर्षाचे सूत्र मान्य करायला पाहिजे होते व सरकारमध्ये स्थान मिळवायला पाहिजे होते. वास्तविक पाहता गेल्या 25 वर्षातील युतीचा इतिहास हा राहिलेला आहे की ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री. मग हे नवीन सूत्र एकदम कसे काय तयार झाले? हे त्यांचे तेच जाणे. विरोधी पक्षामध्ये बसून देवेंद्र फडणवीसांनी आलेली खुर्ची नाकारली, आलेली सत्ता नाकारली अशा पद्धतीचा ग्रह व समज सर्वसामान्य जनतेचा झालेला होता. शरद पवारांनी मी पुन्हा येईन या फडणवीसांच्या वाक्याची खिल्ली सुद्धा उडविलेली होती. उद्धव ठाकरे यांची प्रतिमा सत्तेमध्ये नवखा व्यक्ती अशा पद्धतीची होती. परंतु साधे दिसणाऱ्या ठाकरेंनी स्वतःला मी राजनीती तज्ज्ञ आहे असे दर्शविण्याचा प्रयत्न करीत सत्ता काबीज केली व एक हुशार मुख्यमंत्री अशी प्रतिमा असणारे फडणवीस सत्तेमधून दूर झाले. सत्ता येताच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या मातोश्रीला अधिक जवळ वाटू लागल्या. परिणामी अनेक आमदार, मंत्री व कार्यकर्ते मातोश्रीपासून दूर गेले. कार्यकर्त्यांमध्ये असणारी खंत, त्यांना दिली जाणारी सापत्न वागणूक याचा परिणाम भविष्यामध्ये एखाद्या बंडामध्ये होऊ शकतो हे ओळखण्यात ठाकरे सरकार कदाचित कमी पडले असेच म्हणावे लागेल. याआधी शिवसेनेने अनेक बंड अनुभवलेले होते. त्याचा अनुभव लक्षात घेता सेनेने आणखी एका बंडाची तयारी करून ठेवणे आवश्यक होते. बंड झाल्यास त्याला कसे मोडून काढण्यात येईल याची काही तयारी करायला हवी होती. परंतु ज्या वेळेस हे बंड झाले त्यावेळेस मात्र हे साधे बंड नसून शिवसेनाच पूर्ण समाप्त होईल की काय एवढे मोठे हे बंड होते. गेले आठ दिवस झाले बंडखोर आमदार गुवाहाटीमध्ये बसून होते. एकीकडे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे त्यांना भावनिक साद घालीत होते तर दोन आठवड्यांमध्ये हे बंड मोडून काढू असे युवराज आदित्य ठाकरे म्हणत होते. एकीकडे मुख्यमंत्री भावनिक साद घालत होते तर दुसरीकडे विश्व प्रवक्ते राऊत आमदारांचे मृतदेहच गुवाहाटीमधून येतील अशा पद्धतीची भाषा करीत होते. बंडखोर आमदारांना डुक्कर म्हटले जात होते, त्यांना पक्षातील घाण म्हटले जात होते. शरद पवारांसारखा मुरब्बी माणूस ठाकरे यांच्या जोडीला असतानासुद्धा हे बंड संपू नये यातच बंडाची ताकद आणि शिवसेनेचा कमकुवतपणा दिसून येत होता. अडीच वर्षांपूर्वी जर ठाकरेंना कोणी विचारले असते की तुम्हाला अडीच वर्षाची सत्ता म्हणजे औटघटकेच राज्य पाहिजे आहे की तुम्हाला तुमची संघटना टिकवायची आहे तर कदाचित ठाकरेंनी संघटनेचा पर्याय निवडला असता. जी शिवसेना इतके वर्ष बाळासाहेब ठाकरे यांनी उभी केली एक हिंदुत्ववादी पक्ष अशी प्रतिमा स्वतःच्या पक्षाची उभी केली त्या पक्षाची एवढी मोठी वाताहत त्यांच्या सुपुत्रांकडून केवळ सत्तेच्या नादामध्ये अडीच वर्षात व्हावी हे फार मोठे दुर्दैव आहे असेच म्हणावे लागेल. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यामध्ये जिवंतपणे जरी बाळासाहेब ठाकरेच प्रभावशाली होते तरीही त्यांची शिवसेना त्यांच्या मरणोत्तर शरद पवारांनी संपविली व विजय प्राप्त केला असेच म्हणावे लागेल. अडीच वर्षाच्या सत्ते पायी 25 वर्षाची मैत्री गेली. अडीच वर्षाच्या सत्ते पायी एवढी मोठी संघटना दुभंगली. अडीच वर्षाच्या सत्ते पायी हिंदुत्ववादी ही पक्षाची प्रतिमा संपली. ही अडीच वर्षाची सत्ता मिळवून उद्धव ठाकरे यांनी काय साध्य केले हा प्रश्न त्यांना नेहमीच विचारला जाईल. येणाऱ्या काळामध्ये नवीन सरकार बनवलं जाईल. निष्ठावंत बंडखोर ठरतील व बंडखोर हे निष्ठावंत म्हणून गणले जातील.

वास्तविक पाहता एकनाथ शिंदे यांनी पक्षाची चाळीस वर्षापेक्षा अधिक काळ सेवा केलेली आहे. ते निष्ठावंत व कडवट शिवसैनिक म्हणूनच गणले गेलेले आहे. तळागाळातून त्यांनी शिवसेना वाढविलेली आहे. त्यामुळे त्यांचा स्वभाव हा निष्ठावंताचा स्वभाव आहे. बंडखोराचा नाही. त्यामुळे शिंदे यांचे बंड हा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचा कमकुवतपणा होता असे म्हणावे लागेल. संजय राऊत यांना काहीही बोलण्याची दिली गेलेली परवानगी व राष्ट्रवादी ला दिले गेलेले अवास्तव महत्त्व ही बंडाची काही कारणे म्हणता येईल.

तरीही कर्माचा सिद्धांत असे सांगतो की तुम्ही जे कर्म करता त्याचे फळ हे तुम्हाला भोगावेच लागते. गद्दारी चे फळ गद्दारी चा अनुभव देऊनच पूर्ण होते. दगाबाजीचे फळ दगाबाजीच्या रूपातच मिळते व पाठीमध्ये तुम्ही खंजीर खुपसले तर तुमच्याही पाठीत खंजीर खुपसले जाईल. याही ऊपर आता तर शिवसेना व तिचे अस्तित्वच संकटात सापडलेले आहे. आपली खरी शक्ती संघटना ही उद्धव ठाकरेंनी गमावली आहे. हजारो शिवसैनिकांचे परिश्रम व्यर्थ झाले आहे.अट्टाहास नडला आहे. अनुभव ,परिपक्वता कमी पडली आहे असे वाटते. कर्माचा सिद्धांत विजयी झाला आहे. दगाबाजीच्या झाडाला दगाबाजीचे फळ आलेले आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# हरितक्रांतीचे प्रणेते : स्वर्गीय वसंतराव नाईक

आधुनिक केसरी

**आज हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आजचा दिवस म्हणजे १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. वसंतराव नाईक यांनी शेती व शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना राबविल्या. त्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. वसंतरावांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला जातो.**

महाराष्ट्रात १९७२ साली भीषण दुष्काळ पडला होता. खायला अन्न नाही हाताला काम नाही अशी अवस्था राज्यातील जनतेची झाली होती. अशा भीषण परिस्थितीतही राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे डगमगले नाही. त्यांनी राज्यभर दौरे केले. जनतेला धीर दिला. महाराष्ट्र अन्न धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याची शपथ घेतली. दुष्काळामुळे रोजगार हिरावलेल्या लोकांना काम देण्यासाठी त्यांनी रोजगार हमी योजना लागू केली. या योजनेची त्यांनी प्रभावी अंमलबजावणी केली त्यामुळे सर्वांना रोजगार मिळाला. या योजनेमुळे लोकांना रोजगार तर मिळालाच पण राज्याच्या विकासालाही गती मिळाली. ही योजना गेमचेंजर ठरली. राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनले. या योजनेमुळे सरकारला दुष्काळावर मात करता आली. पुढे हीच योजना केंद्र सरकारने स्वीकारली. आज ती मनरेगाच्या रूपाने रोजगाराची वाहिनी बनली आहे. वसंतराव नाईक यांनी शेती व शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना राबविल्या. त्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. वसंतरावांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला जातो. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण,



शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेलती जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सुखी संसाराचे रहस्य



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**सुसंस्कृत स्त्रीच आपल्या मुलांना चांगले संस्कार देऊ शकते. स्त्री जर धार्मिक असेल, तर अत्यंत उत्तम. प्रत्येक व्यक्तीने रागावणे आणि भांडणे टाळले पाहिजे. पण विशेषतः पत्नी शांत स्वभावाची असेल तर घरात नेहमी सुख-शांती नांदते. शांत आणि आनंदी स्वभावाची स्त्री घराला सकारात्मकतेने भरते. ती सर्वांना प्रेम आणि आदर देते. अशा स्त्रीशी लग्न करणारी व्यक्ती खूप भाग्यवान असते. आयुष्यात चांगले आणि वाईट दिवस येत जात राहतात, पण जर पतीच्या वाईट दिवसांत ठामपणे उभी राहणारी स्त्री जोडीदाराचं नशीब फुलवून टाकते.**

पती-पत्नीमध्ये प्रेम आणि आदर असेल तरंच कुटुंबात आनंद नांदतो. कोणत्याही नात्यामध्ये प्रेम आणि आदर अत्यंत महत्त्वाचा असतो. पण कुटुंब सुखी, सुसंस्कृत आणि समृद्ध करण्यात महिलांचा मोठा वाटा असतो. घरातील स्त्रीमध्ये काही विशेष गोष्टी असतील तर घर स्वर्गासारखे बनते, म्हणून पत्नीला लक्ष्मीचे रूप म्हटले जाते. चाणक्य नीतीमध्ये स्त्रीची अशी काही वैशिष्ट्ये सांगण्यात आली आहेत, ज्यामुळे पतीचं आयुष्य फुलून जातं. पण यामध्ये पतीची देखील साथ अत्यंत गरजेची असते. स्त्री सुशिक्षित, सुसंस्कृत असेल तर संपूर्ण कुटुंब चांगल्या वातावरणात तयार होतं. अशा कुटुंबातील नवीन पिढी सुसंस्कृत आणि चांगली होते.
विवाहानंतर दोन वेगवेगळ्या वातावरणातल्या वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या व्यक्ती एकत्र येतात. एकत्र येतात म्हणजे काय? तर जन्मभरासाठी एकमेकांच्या सुखदुःखाचे भागीदार होतात. विवाह होईपर्यंत आपल्या कमावत्या मुलावर आई-वडिलांचे जे बंधन नसते, मुलगा म्हणून ज्या अनेक सवलती मुलाला मिळालेल्या असतात, त्या सर्वावर आता मात्र नववधूची बंदी आलेली असते. उठण्या-बसण्याच्या वेळेपासून तर जेवणा-फिरण्याच्या बाबतीतही पत्नीची रोकटोक हळूहळू सुरू होते. सुरुवातीला पतीला सुध्दा बरे वाटते. आपल्याला कुणीतरी हक्काने, प्रेमाने सांगते, आपल्याला विनंतीवजा आज्ञा करते यातही पतीला सुख मिळत असते.
परंतु याच्या उलट पत्नीचे होते, पतीच्या आवडी-निवडी संदर्भात... पतीच्या आवडत्या रंगाची साडी, कुणाकडे जायचं? कुठे जाणे टाळायचे? वगैरे बाबतीत पतीची मर्जी... कुठे काय बोलायचे? यावर पतीचा लगाम... 'फर्स्ट इंप्रेशन इज द लॉस्ट इंप्रेशन' ही म्हण मनात घोटूनच पत्नीने पहिले पाऊल पतीगृही टाकलेले असते. कारण तिला हे चांगलेच माहीत असते की, आता काही दिवस आपण यांचे ऐकून घ्यायला हवे. एकदा का आपण यांना आपलंस केले की, मग जन्मभर हे आपले ऐकणार. नव्हे, आपण यांना ऐकायला लावणारच... म्हणून ती सुध्दा सुरुवातीला 'यांच्या' तालावर नाचायला खुशीने तयार असते. पण किती दिवस?
महिना-दोन महिने-लवकरच प्रेमाचा ज्वर उतरतो. तिला व त्याला दोघांनाही मग आठवण होते की, आपल्यालाही एक मन आहे, त्याच्या काही अपेक्षा आहेत. यामुळे दोघांमधील 'स्व' जागृत झाला की, इथूनच वादावादीला सुरुवात होते.
अनेकदा पती-पत्नीतील वादाचं कारण इतकं क्षुल्लक असतं की त्यावर त्यांनी शांतपणे विचार केल्यास त्याचं त्यांना हसू येईल आणि आपण विनाकारण एवढ्या क्षुल्लक गोष्टींसाठी भांडत बसलो हे कळेल. शिवाय ही चूक परत होणारही नाही. पण पती-पत्नी स्वतःच्या चुकांकडे त्रयस्थ भूमिकेतून बघतच नाही आणि वारंवार त्याच त्या चुका त्यांच्याकडून घडत राहतात. परिणामी, संसारात उगाचच कटुता निर्माण होते.
खरे तर विवाह हे जसे एक बंधन आहे, तसेच तो आपसातला एक सलोखा आहे, नव्हे असावा. कधी पतीला तर कधी पत्नीला एकमेकांनी एकमेकांची बाजू समजून घ्यावी लागते. ज्या दाम्पत्याजवळ समजून घेण्याची शक्ती जास्त असेल त्यांच्यात कलह फार कमी प्रमाणात होतात. पण मुळीच भांडण झालेले नाही किंवा होतच नाही, असे एकही दाम्पत्य या पृथ्वीतलावर सापडणार नाही हे विधान ठामपणे करता येते. कारण दोन भिन्न व्यक्ती एकत्र



आल्यात की, प्रत्येक गोष्टीत फरक असणारच. विवाह सलोखा असतो. कधी याला तर कधी तिला आणि अनेकदा दोघांनाही थोडंफार बदलावेच लागते.
मात्र प्रत्येकदा पत्नीनेच झुकते माप घ्यावे असं बहुतांशी सगळ्यांचेच मत असते. पण हा नियम नाही. वेळ व परिस्थिती बघून जो कोणी सलोखा करील त्याचा संसार सुखाचाच होतो.
प्रत्येक स्त्री-पुरूषाच्या मनात आपल्या भावी जीवनाबद्दल स्वप्न असतात. पण स्वप्न नेहमीच सत्यात उतरतील असंही नाही.
आपला जीवनसाथी आपल्याला हवा तसा मिळाला नाही, हा राग त्याच्यावर काढणे कितपत योग्य आहे? शिवाय कॉलेज मुलींच्या बहुतांश जीवनसाथी बद्दलच्या कल्पना म्हणजे पिक्चरमधला हिरोच... ज्यात सगळेच गुण चांगले असतात. परंतु एकाच व्यक्तीत सगळे चांगले गुण निघणे हे फक्त पिक्चर व कथा-कादंब-यातच शक्य आहे. पिक्चर व प्रत्यक्ष जीवन यात खूप तफावत आहे, हे प्रत्येक तरुणींनी लक्षात घ्यायला हवे.
आपल्या नेहमी असे बघण्यात येते की, ज्या घरात आई-वडीलांमध्ये प्रेम आणि वैचारिक साम्य असेल त्या घरातील मुले मानसिकरीत्या निरोगी असतात. त्यांच्या वागण्या-बोलण्यात मोकळेपणा असतो, धारिष्ट्य असते आणि त्यांच्याजवळ आत्मविश्वासही भरपूर असतो. घरातले वातावरण मोकळे व उत्साहपूर्ण असते. कुठेही गेलेत तरी त्या वातावरणात ते नेहमीच लवकर मिसळतात आणि आपल्या मोकळ्या स्वभावामुळे लवकर लोकप्रिय होतात.
याच्या अगदी उलट दृष्य ज्या घरात पती पत्नीमध्ये नेहमी कलह असेल, भांडणे होत असतील, अशा घरातली मुले नेहमी उदास आणि शांत दिसतात. ही मुले एकदम कुणातच मिसळण्याची हिंमत करीत नाहीत. त्यांना आई-वडीलांची मोकळीक न मिळाल्यामुळे ते नेहमी कुढतात, असंतुष्ट असतात. पुढे जाऊन त्यांना प्रेम मिळाले तरी ते मात्र कुणावरच मोकळेपणाने प्रेम करू शकत नाही. दुसरा आपल्यावर खरंच प्रेम करतो यावर त्यांचा विश्वास बसत नाही. अशा व्यक्तीचा स्वभाव बदलणं कठीण असतं. जर का त्यांना जीवनसाथी कठोर स्वभावाचा किंवा ज्याला आपण बाळबोध भाषेत शिष्ट म्हणू असा मिळाला तर तो त्याला भावनात्मकदृष्ट्या समजून घेऊ शकत नाही. अशावेळी त्या दोघांच्या संसारात चांगलीच दरी निर्माण होते आणि त्यांचं जीवन नैराश्यपूर्ण बनते.
आपल्याकडील विवाहपध्दती ही एखाद्या जुगारासारखी आहे. मोठे लोक लग्न जुळवतात. वर-वधू एकमेकांना फार कमी वेळ बघतात. मुलीला तर एखादा कटाक्ष टाकूनच मुलाला बघावं लागते, मोठेच लोक सगळा पुढाकार घेतात. वर वधूला एकमेकांना पाहण्याची, बोलण्याची, एकमेकांची आवड-निवड समजून घेण्याची कोणतीच संधी त्यांना बहुतेक मिळत नाही. कितीही सुधारणा झाल्या म्हटलं तरी लग्न जुळल्यावर एकमेकांची ओळख करून घेण्याची, एकमेकांशी वैचारिक देवाणघेवाण करण्याची संधी फक्त १० टक्के लोकांनाच मिळते आणि उरलेल्या ९० टक्के लोकांना विवाहानंतर एकमेकांच्या स्वभावाची ओळख होते, तेव्हा वेळ निघून गेलेली असते. मग जसे आहे तसेच स्वीकारणे भाग पडते. पण अशावेळी चिडचिड करून, जोडीदारासोबत भांडण करून काहीही उपयोग होत नसतो. जो अशा वातावरणात वाढलेला असेल तशा सवयी त्याला लागतात. म्हणून हळूहळू प्रेमानेच त्याला वळवता येते.
खूपदा पती खूपच अव्यवस्थित असतात तर पत्नी म्हणजे स्वच्छतेची भोक्ती. कोणतीच वस्तू त्याला नीट जागेवर ठेवाविशी वाटत नाही, तर याच बाबतीत पत्नीचा कटाक्ष... या गोष्टी दिसायला फार छोट्या असल्या तरी अनेकदा याच गोष्टींचा दोघांनाही मनःस्ताप होतो. यावर नुसती चिडचिड करून किंवा दुस-याजवळ तक्रारी करून चालायचे नाही, तर त्याची वस्तू नेहमी त्यालाच शोधायला लावायची. दोन-चारदा त्रास झाला म्हणजे व्यवस्थितपणाचे महत्त्व पती राजांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. टोकाची भूमिका घेण्यापेक्षा प्रेमाने पतीला लवकर जिंकता येईल यावर सगळ्यांनीच विश्वास ठेवायला हरकत नाही. घराच्या टापटिपीसोबत स्त्रियांनी स्वतःकडेही जातींनी लक्ष पुरवावं. शारीरिक स्वच्छतेने मानसिक समाधान मिळतं. अनेकदा घर साफ करता करता स्त्रिया स्वतःकडे मात्र पूर्ण दुर्लक्ष करतात. रात्री झोपायला बेडवर आल्यात की त्यांच्या साडीला मसाल्याचा वास व शरीराला घामाचा वास येतो, अशा पत्नीला जवळ घेण्याची कोणत्या पतीला इच्छा होणार?
एक गोष्ट मात्र दोघांनीही आयुष्यभर लक्षात ठेवायला हवी. एकमेकांमध्ये काय वाट्टेल ते महायुध्द घडो. पण एकमेकांचे दोष दुस-यांसमोर मुळीच काढू नये. यामुळे तिच्या आत्म्याला धक्का लागतो. पती किंवा पत्नी कधीच दुस-यासमोर स्वतःचा अपमान सहन करू शकत नाही. कुणी एकाने आधी दुस-यासमोर अपमान केला की, ते तिच्या मनात पक्केपणी रूतून बसतं आणि ती पण मग त्याचा अपमान करण्याची संधी बघत असते. अशाने उगाचच तेढ निर्माण होऊन संबंध बिघडतात. अर्थातच संसारात हा सूर मुळीच नको. एकरूप होऊन संसार करण्याच्या उमेदीत सुरुवातीचे दिवस सुरू होतात आणि हळूहळू असे कटू रंग त्यात भरले जातात आणि संसाराची घडी विस्कटल्या जाते. पण यात संयम, थोडा धीर, मनाचा मोठेपणा, झालं गेलं विसरून जाण्याची भावना, अशा छोट्या छोट्या गोष्टींच भान ठेवलं तर प्रत्येकाचा संसार नक्कीच सुखाचा होईल.
प्रेम करताना सुखी संसाराची अनेक स्वप्न रंगवणा-या प्रेमीयुगुलांची प्रेमविवाहानंतर अगदी सहा महिन्यातच मने दुभंगत आहेत. गेल्या पाच वर्षांत २ हजार ८६२ दाम्पत्यांनी प्रेमविवाहानंतर विभक्त होण्याचा निर्णय घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ८० टक्के प्रेमविवाहास कुटुंबीय तयार होत नाहीत. जात-धर्म, मुलाचे वय, आर्थिक स्थिती, उत्पन्नाचे साधन, आईवडिलांची प्रतिष्ठा अशा अनेक कारणांमुळे प्रेमविवाह नाकारला जातो.
त्यामुळे अनेक प्रेमीयुगुल कुटुंबीयांच्या विरोधात जाऊन विवाह करतात. काही प्रेमीयुगुल तर थेट घरातून कपडे, पैसे, दागिने घेऊन पळून जाऊन बोहल्यावर उभे होतात. लग्न झाल्यानंतर मात्र अडचणींचा ससेमिरा सुरू होतो. त्यासाठी तडजोड करताना खटके उडायला लागतात. वाद-विवाद वाढून संसार मोडण्याची स्थिती निर्माण होते. प्रेमविवाह झाल्यानंतर अनेकदा प्रेमीयुगुलांचा अटी व शर्थीनुसार संसार सुरू होतो. लग्न झाल्यानंतर दोघांत सासरच्या मंडळींचा हस्तक्षेप नको असतो. सध्या बाळ नको, माहेरचे येणार तर सासरचे नको, नोकरी करणार किंवा नाही करणार, मित्रांसोबत पार्टी हवी की नको, अशा अनेक कारणातून वाद विकोपाला जातात.
लग्नापूर्वी तू असा वागायचा, आता तुझ्यात खूप बदल झाला तू मला वेळ देत नाही, तुझे कुठे बाहेर कुणाशी संबंध तर नाहीत ना अशा अनेक संशयांचे जाळे अधिक घट्ट होत जाते. काही प्रकरणात मुलेही प्रेयसी असलेल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतात. चारित्र्यावर संशय हा सर्वात मोठा घटक घटस्फोटासाठी कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. प्रेमविवाह केल्याच्या अगदी काही महिन्यानंतर पती-पत्नींमध्ये वाद होतात. अशी अनेक जोडपी भरोसा सेलमध्ये समुपदेशनासाठी येतात. भरोसा सेल त्यांच्या अडचणी आणि समस्या समजून घेत त्यांचा संसार पुन्हा फुलविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत असतात.


# यशोधरेची यशोगाथा



सुजित ताजने
संपर्क क्र. 9822444011

आधुनिक केसरी

**यशोधरा यांचा अंतसमय जेव्हा जवळ आला तेंव्हा त्या बुद्धांना भेटावयास गेल्या. त्यांना वंदन करून त्या म्हणाल्या "तुमच्या पूर्वश्रमीची मी स्त्री आहे. मी आता थकून गेली आहे. जीवन थोडेच शिल्लक राहिले आहे. तुम्हास मी लवकरच सोडून जाईन. माझे निब्बाण मी प्राप्त केले आहे. आता काही करायचे बाकी नाही. या संसारात जर माझ्याकडून तुम्हाला काही त्रास झाला असेल तर मला क्षमा करा." असे बोलून त्यांनी बुद्धांचा निरोप घेतला. त्यानंतर दोन दिवसातच त्यांचे परिनिर्वाण झाले. त्या समयी त्या ७८ वर्षांच्या होत्या.**



बौद्ध धम्माच्या साहित्यामुळे बुद्धसमकालीन श्रावकसंघातील अनेक व्यक्तींचा परिचय होतो. असंख्य महाश्रावक, भिक्षुंणी, उपासक आणि उपासिका यांची माहिती मिळते. त्यातील एका भिक्षूणीची व्यक्तिरेखा अशी आहे की तिचे वर्णन वाचल्यावर मन गलबलून जाते. ही भिक्षूणी दुसरी तिसरी कोणी नसून सिद्धार्थ गौतम यांची पत्नी यशोधरा होय. बौद्ध साहित्यात त्यांच्याबद्दल जास्त कुठे लिहिलेले आढळत नाही. पुत्र राहुल याचे संगोपन करण्यात त्यांचे अर्धे आयुष्य खर्ची झाले असल्याने त्यांच्याबद्दलच्या गाथा जास्त आढळून येत नाहीत. पतीने घेतलेल्या निर्णयाला अनुमोदन देऊन पुढे त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून त्यांनी सुद्धा सर्वसंगपरित्याग केला. दुःख भावनेची कुठेही वाच्यता केली नाही. यावरून त्यांची धैर्यशीलता कळते.
सिद्धार्थ गौतम ज्ञानप्राप्ती नंतर जेव्हा बुद्धत्व प्राप्त करून कपिलवस्तू येथे आले तेंव्हा यशोधरा यांचा बांध फुटला. त्या सैरभैर झाल्या. त्या प्रसंगाची अनेक लेखकांनी आणि कवींनी वर्णने केली आहेत. पुत्र राहुलला त्यांनी पित्याजवळ जाऊन आपला वारसा मागण्यास सांगितले. राहुल जेव्हा बुद्धांकडे गेला तेव्हा त्याला देखील त्यांनी संघात दाखल करून घेतले. यामुळे यशोधरा मनातून उन्मळून पडल्या असाव्यात. परंतु नंतर बुद्धांचा मावस भाऊ नंद आणि चुलत भाऊ आनंद यांनी देखील संघामध्ये प्रवेश केला. कालांतराने सावत्रमाता व मावशी महाप्रजापती गौतमी यांनीदेखील आनंदला सांगून बुद्धांचे मन वळविले व प्रवर्ज्या घेतली. यशोधरेने सुद्धा त्याच वेळेला प्रवर्ज्या घेतली. अशा तऱ्हेने भिक्षुणी संघ स्थापन झाला. यशोधरा यांनी नंतर उर्वरित आयुष्य ध्यानसाधनेत व्यतीत केले. संघाची सेवा केली. पुढे लवकरच त्या ध्यानसाधनेत परिपक्व झाल्या व अहर्त पद प्राप्त केले. थेरी गाथेत यशोधरा यांच्या गाथा नाहीत. परंतु थेरी अपदानात यशोधरेच्या गाथा आढळतात. उपसंपदा घेतल्यानंतर त्यांचे नाव भद्दा कंच्चाना झाले. कठोर ध्यानसाधनेमुळे त्यांना दिव्यश्रोत, दुसऱ्यांचे चित्त जाणणे, पुनर्जन्म जाणणे, दिव्य चक्षु, आर्य सत्याचे ज्ञान व सिद्धी प्राप्त अशा सहा अभिज्ञा प्राप्त झाल्या. म्हणून त्यांना अभिज्ञालाभिणी असे देखील म्हटले गेले आहे.
अंतसमय जेव्हा जवळ आला तेंव्हा त्या बुद्धांना भेटावयास गेल्या. त्यांना वंदन करून त्या म्हणाल्या "तुमच्या पूर्वश्रमीची मी स्त्री आहे. मी आता थकून गेली आहे. जीवन थोडेच शिल्लक राहिले आहे. तुम्हास मी लवकरच सोडून जाईन. माझे निब्बाण मी प्राप्त केले आहे. आता काही करायचे बाकी नाही. या संसारात जर माझ्याकडून तुम्हाला काही त्रास झाला असेल तर मला क्षमा करा." असे बोलून त्यांनी बुद्धांचा निरोप घेतला. त्यानंतर दोन दिवसातच त्यांचे परिनिर्वाण झाले. त्या समयी त्या ७८ वर्षांच्या होत्या. भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणापूर्वी दोन वर्षे अगोदर यशोधरा यांनी या जगाचा निरोप घेतला. सर्वांवर उपकार करणारी, सुखदुःखात समानतेने राहणारी, दया व अनुकंपा दाखवणारी यशोधरेची मुक कहाणी बौद्ध साहित्यात अमर आहे.

# बंद खोलीतलं आयुष्य



योगेश गुंजकर
संपर्क क्र. 9370995167

आधुनिक केसरी

**त्या दिवशी धावपळीने कसा तरी दवाखाना गाठला. जवळच्या पाहुण्याला हृदय विकाराचा झटका आला आणि आम्ही दवाखान्याच्या दिशेने धाव घेतली. दुपारचे २/३ वाजले होते. आम्हाला दवाखान्यात जाता जाता ५ वाजले. कारण जिल्ह्याच्या ठिकाणी दवाखाना होता. आम्ही तिथे जाताच तिथल्या डॉक्टरांनी आम्हाला धीर देण्याचा काम केलं. आणि पेशंटला 'अतिदक्षता' विभागात दाखल केलं. आणि उपचार पद्धती सुरू झाली. कळत-नकळत माझी नजर एका मुलीवर पडली.**



तिने नुकतेच या जगात पाऊल ठेवले होते. गोल तोंडाची, भोकरासारखे तिचे निळसर डोळे, तिच्या दोन्ही हाताच्या मुठी घट्ट आवळलेल्या. जणू तिनं तिचं आयुष्य-भविष्य दाबून ठेवल्यासारखं. कोण होती? तिचं नाव? तिचं गाव कोणतं? या प्रश्नांची उत्तरे सध्या तरी माझ्याकडं नव्हती. पण तिने मला आकर्षित केलं होतं. तिच्या स्मित हास्यान मी फ्लाईट झालो होतो. न राहून मी तिच्या आज्जी जवळ गेलो आणि चालू झाली माझी 'महाचर्चा'. एक वेगळ्या प्रवासाची......

मी बोलत गेलो ती आज्जी सांगत गेली. जीन या जगात पाऊल ठेवलंय ती किलकिल्या डोळ्यांनी पाहत होती. काहीतरी बोलायचं होत तिला. पण ती अबोल होती. सविस्तर विचारलं असता एक धक्कादायक प्रकार घडला होता. ठेवलेलं पाऊल मागे घेण्याचा.... सोप्प्या भाषेत सांगायचं म्हणजे जन्माला आल्यावर 'भ्रूण' हत्या करण्याचा. पण हे सगळं नियतीला मान्य नव्हत. कोण्या एका गावातून त्या गरोदर मातेला लपवून-छपवून दवाखान्याच्या पायरीला आणलं गेलं. दारूच्या नशेत नको ते काम करायला तो 'बाप' तयार झाला होता. मी बोलत गेलो ती मायमाउली सांगत गेली. त्यांना मुलगी नको होती. वंशाचा दिवा लावण्यासाठी मुलगा हवा होता. म्हणून तो नशेत असणारा बाप बार-बार एक-एक पायरी चढायचा. पण उद्याच्या भारतमातेला रणरागिणी हवी होती. तो नशेत तर होताच पण अधून-मधून आल्या गेल्या लोकांना राम-राम घालायचा.

त्याला जेव्हा सांगितलं गेलं की तुझी बायको इथे नाही ती दुसऱ्या दवाखाण्यात आहे. तेव्हा तो खाली उतरला आणि परत कधी त्या पायरीवर आला नाही. मला पाहून ती छोटी स्मित हास्य द्यायची. तर कधी तोंड कडू-मडु करायची. ती झोपलेली असायची तेव्हा अजून छान दिसायची. कधी झोपेत तर कधी जाग असल्यावर खळखळून हसायची. चुटकी वाजल्यावर तर भलतीच खूष व्हायची. कधी सकाळी तर कधी दुपारी एकटीच आपल्या नादात खेळायची. पायाचे अंगठे नेहमी तोंडात धरायची. जवळ गेलं तर बोटाला घट्ट आवळून धरायची. जणू मी तिचा लांबून का होईना कोणीतरी लागत होतो. २/३ दिवस झाल्यावर माझ्या काकाला सुट्टी झाली. आम्हाला अचानक हे सगळं कळलं आणि एक प्रकारचं दुःख आणि सुख सोबत झालं. पेपर, बिल, पोचपावती राहिलेलं मेडिसिन परत केलं आणि दवाखान्याच्या गेट वर आलो. पण मन मात्र त्या छोट्या मुलींमधून निघायला तयार होईना. कोण होती ती? कुठली होती ती? तिचं नाव गाव कशाचाचं पत्ता नाही. पण मी मात्र त्या दैवीशक्तिशी एकरूप झालो. जणू ती छोटी म्हणत होती...' मामा मला सोडून जाऊ नको... मामा मला सीडून जाऊ नको. शेवटी न राहून मी पुन्हा वर गेलो आणि तिचा गोड एक पापा घेतला.तीच स्मित हास्य पुन्हा एकदा काळजाला भिडणार होत. जड अंतकरणाने मी तिच्या पाहत १०० रुपयांची नवी करकरीत नोट दिली. तिने ती घट्ट पकडली. जणू ती माझी शेवटची निशाणी होती. खाली येताना मात्र डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

त्या दिवशी मला ते 'बंद खोलीतल आयुष्य' किती जाचक आणि त्रासदायक असत याचा अनुभव आला. कार मध्ये बसलो आणि एकदा त्या दवाखान्याकडे बघितलं तेच स्मित हास्य आजही डोळ्यासमोर दिसत आहे.

# ग्लॅमरच्या दुनियेत राहूनही प्रेमाशी एकनिष्ठ राहिलेल्या अविवाहित अभिनेत्री



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

**प्रेम ही भावना आहे. प्रेमाला वय नसतं. प्रेम कुणावर ही होऊ शकतं. प्रेम हे मनापासून होत नाही तर मनापासून अनेक भावना असतात ज्यात वेगवेगळे विचार गुंतलेले असतात. प्रेम स्नेहातून आनंदाकडे हळूहळू जाते. हे एक मजबूत आकर्षण आणि वैयक्तिक कनेक्शनची भावना आहे जी तिला सर्वकाही विसरून तिच्यासोबत जाण्यास प्रवृत्त करते. पण विशेष महत्व आहे ग्लॅमर सारख्या दुनियेत राहून ही आपल्या प्रेमाशी प्रामाणिक राहणं. आपण ग्लॅमर दुनियेत नसताना देखील आपले किमान तीन - चार तरी अफेअर्स, ब्रेक अप असतात. ग्लॅमर दुनियेतील ही अफेअर्स, ब्रेक अप आपण रोजच पाहत असतो. आज आपण जाणून घेत आहोत, ज्यांनी ग्लॅमर दुनियेत राहून ही प्रेमाशी एकनिष्ठ राहिल्या. नुसत्या एकनिष्ठ नाही राहिल्या तर आयुष्यभर अविवाहित राहिल्या.**




## सुरैया

सुरैया आपल्या काळातील प्रसिद्ध गायिका व नायिका होती. ती आपली गाणे स्वतःच गायची त्यावेळी देवानंद हे नवोदित कलाकार होते. आणि सुरैयाचे फॅन होते. "विद्या" चित्रपटात ते प्रथम समोरासमोर आले. देवानंद त्या चित्रपटाचे नायक तर सुरैया नायिका होती. पहिल्या भेटीतच ते दोघे एकमेकांना आवडू लागले होते. याच चित्रपटात देवानंद आणि सूरैयाचा एक बोटचा सीन होता. शूट करत असताना बोट पाण्यात पलटी झाली. सूरैया डूबायला लागली. तेंव्हा देवानंद यांनी सुरैयाला वाचवलं तेंव्हा सुरैया देवानंद ला म्हणाली, " तुम्ही नसता तर मी वाचू शकले नसते," देवानंद म्हणाले," तू वाचली नसती तर मी पण या जगात राहिलो नसतो" यानंतर दोघे ही एकमेकांच्या प्रचंड प्रेमात पडले. पण दोघांच्या प्रेमात आडवा आला धर्म. सुरैया मुस्लिम होती तर देवानंद हिंदू. सुरैयाचा घरचा प्रचंड विरोध झाला. सुरैया आणि देवानंद यांनी लग्न करण्याचा प्रचंड प्रयत्न केला. पण सुरैयाला जेंव्हा कळलं की तिच्यामुळे देवानंदचा जीव धोक्यात आहे तेव्हा सुरैयानी देवशी फारकत घेतली. पण आयुष्यभर देवानंद यांच्या आठवणीत अविवाहित राहिली.




## आशा पारेख

आशा पारेख ही बालकलाकार म्हणून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. पण नायिका म्हणून तिला कामं मिळत नव्हती. डायरेक्टर विजय भट्ट नी आपल्या "गुंज उठी शहनाई" मधून तू नायिकेस पात्र नाही म्हणून आशा पारेखला दोन दिवसाच्या चित्रीकरणानंतर काढलं होतं. अशावेळी निर्माता दिग्दर्शक नासीर हुसेन आमिर खानचे काका यांनी आशा पारेख यांना आपल्या शम्मी कपूर सोबत "दिलं देके देखो" या चित्रपटात नायिका म्हणून संधी दिली. आणि चित्रपट हिट झाला. आशा पारेख रातोरात स्टार झाली. लगातार सहा चित्रपटात आशा पारेख ही नासीर हुसेन यांची नायिका राहिली आणि सहा ही चित्रपट सुपर ड्युपर हिट राहिली. तिसरी मंजिल, बहारों के सपने, प्यार का मौसम, फिर वही दिल लाया हूं, जब प्यार किसी से होता है, हे होत.

आशा पारेख नासीर हुसेन यांच्या प्रेमात पडल्या होत्या तेंव्हा नासीर हुसेन विवाहित होते. प्रेम करीत असताना नासीर हुसेन यांचा संसार पण मोडू नये याची ही काळजी आशा पारेख यांनी घेतली. पण स्वतः मात्र आयुष्यभर अविवाहित राहिल्या. मनात दुसरं कुणी नाही आलं. नासीर हुसेन च्या प्रेमात पडल्या आणि आयुष्यभर अविवाहित राहिल्या, अशा क्वचितच स्त्रिया पाहायला मिळतात.




## सुलक्षणा पंडित

सुलक्षणा पंडित संगीतकार कुटुंबातील मुलगी. पंडित जसराज त्यांचे काका तर वडील शास्त्रीय गायक होते. जतिन ललित ही तिचे भावंडं. सुलक्षणा पंडित स्वतः गायक होती. बऱ्याच सिनेमात ती गायली पण तिचे ओळख नायिका म्हणुनच झाली. अपनापन, उलझन, फांसी, हेराफेरी, खानदान, सलांखे, अमर शक्ती, संकोच इत्यादी सिनेमातून ती प्रेक्षकांच्या लक्षात राहिली. संजीव कुमार सोबत तिने सात चित्रपटात काम केले. याच दरम्यान ती संजीव कुमारच्या प्रेमात पडली पण हेमामालिनीने संजीव कुमारचा लग्नाचा प्रस्ताव अमान्य केल्यामुळे संजीव कुमार डिप्रेशन मध्ये गेले होते. त्या दुःखात त्यांच्या दारूचं सेवन वाढलं होतं, सुलक्षणा पंडित संजीव कुमारची जवळची मैत्रीण होती. संजीव कुमार आपल्या सगळ्या व्यक्तिगत गोष्टी सुलक्षणाशी शेअर करायचे. सुलक्षणा पंडितनी बऱ्याचदा आपल्याशी लग्न करण्याचा प्रस्ताव संजीव कुमार समोर मांडला पण संजीव कुमार हेमामालिनीच्या प्रेमात इतके बुडाले होते की सुलक्षणाच्या प्रस्तावावर ते विचारच करू शकले नाहीत. जेव्हा हेमामालिनीने त्यांच्या लग्नाचा प्रस्ताव नाकारला तेंव्हा संजीवकुमार दारूच्या आहारी गेले आणि वयाच्या ४८ वर्षी त्यांचे निधन झाले. संजीव कुमारचे निधन हा इतका मोठा आघात होता की आज ही सुलक्षणा यातून बाहेर आली नाही.आज ही त्या अविवाहित आहेत.

ग्लॅमर दुनियेत राहून ही या नायिकेनी आपल्या प्रेमाशी एकनिष्ठ राहिल्या आणि आजीवन अविवाहित राहिल्या. ग्लॅमर दुनियेची हवा यांच्या डोक्यात कधी शिरली नाही म्हणून माझा सलाम या नायिकेना.

# भाकरी फिरवायची नाही, तवा बदलायची वेळ आली आहे...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**लोकशाही आणि मानवतेच्या तत्वांची पायमल्ली करणाऱ्या तथाकथित मुठभर धनदांडग्या, राजकारणी लोकांनी महाराष्ट्रात "फुले-शाहू-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र" हा क्लॉज जसा गुळगुळीत करून टाकला आहे, अगदी तसेच "एकाच बाजूने भाकर राहिली तर ती करपते, तेंव्हा भाकर फिरवली पाहिजे !" ही म्हण सुद्धा निष्प्रभ करून टाकली आहे. असे लिहिण्याचे कारण म्हणजे दलदलीतून मार्गक्रमण करत असलेले महाराष्ट्राचे राजकारण ! तेंव्हा, दुर्दैवाने आज लिहावे लागते की; करपते आहे म्हणून केवळ भाकरी फिरवायची वेळ आली नसून भाकरी भाजायचा तवाच बदलायची वेळ आली आहे ! म्हणजेच विद्यमान सर्वच आमदार-खासदारांची आणि त्यांच्या घराण्यांची आमदारकी-खासदारकी कायमची थांबवून त्याऐवजी नवीन, उच्च शिक्षित, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, अधिव्याख्याता, विचारवंत, निर्व्यसनी, तरुण आणि चाळीस ते पन्नास वर्षांच्या आतील विवेकी, सुज्ञ-सुजाण लोकांना आमदारकी-खासदारकीची उमेदवारी देऊन नवा महाराष्ट्र आणि उज्वल भारत निर्माण करण्याची संधी देणे ही काळाची गरज बनली आहे ! कदाचित ही बाब प्लेटोच्या आदर्श राज्यासारखी काल्पनिक आणि अशक्य वाटत असली, तरी या विचारात गैर काय आहे ?**

लोकशाही शासन प्रणालीत देशाची किंवा राज्याची सत्ता कुणाच्या हाती असावी ? या प्रश्नाचे उत्तर पाश्चिमात्य विचारवंत प्लेटो मोठ्या मार्मिक पद्धतीने देतात, "जोपर्यंत या जगात तत्ववेत्ते राजे होत नाहीत, किंवा ज्यांना आपण आता राज्यकर्ते म्हणतो ते खऱ्या अर्थाने तत्वज्ञ होईपर्यंत राज्यांच्या किंवा मानवतेच्या संकटांचा अंत होणार नाही." आज देशासमोरची संकटं संपवून देश जर आणखी उत्तुंग यशोशिखरावर न्यायचा असेल तर जात-धर्म-पंथ हे संकुचित विचार बाजूला ठेवून, संपूर्ण मानव जातीच्या कल्याणार्थ आणि लोककल्याणकारी तत्वांची अंमलबजावणी करणारे राज्यकर्ते सत्तेवर आले तरच खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाहीचा शतक महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा होईल ! याच अनुषंगाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि लोकशाही शासन प्रणालीचे महान अभ्यासक डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिहितात, "सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकूच शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? सामाजिक लोकशाही म्हणजे अशी शासनप्रणाली जिथे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुलभूत तत्वे नित्य नंडवीत." लोकशाहीचा पुरस्कार करतांना भारतीय राज्यघटनेने न्यायव्यवस्थेच्या आधारे अती राजकीय हस्तक्षेपाला चाप बसवण्याचे कार्य करून न्यायमंडळ स्वतंत्र ठेवले आहे. असे असतांना सुद्धा आज आपण ही सामाजिक लोकशाही कुठे घेऊन जात आहोत ( ? ) हा मुलभूत प्रश्न विचारण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

एकीकडे आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असून जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताला सर्वत्र गौरवान्वित होतांना पाहून मन आनंदीत होत आहे ! निसंशय, आपल्या सर्वांसाठीच ही अभिमानाची, सन्मानाची, आनंदाची बाब आहे ! मात्र दुसरीकडे विद्यमान प्रशासनात राजकीय हस्तक्षेप वाढतांना पाहून लोकशाहीचे काय होईल ( ? ) अनामिक भीती वाटायला लागली आहे. देशात लोकशाहीला घराणेशाहीची खोलवर वाळवी लागली आहे. इथे अशी बरीच घराणी आहेत, ज्या घरांत भारतीय स्वातंत्र्यापासून आमदारकी-खासदारकी चालूच आहे. आजोबा-मुलगा-नातू-पणतू इथपर्यंत एकाच घरांत राजेशाहीप्रमाणे लोकशाही पाणी भरते आहे, हे महाभयंकर आणि सामाजिक-संसदीय लोकशाहीला अत्यंत घातक आहे ! बऱ्याच घरातील लोकांना आमदार-खासदार-मंत्रिपद याचे काहींच अप्रूप वाटत नाही ! एका खिशात आमदारकी, दुसऱ्या खिशात मंत्रिपद आणि वरच्या खिशात खासदारकी घेऊन फिरणाऱ्या माणसांना याची काहीच किंमत उरली नाही ! तीसरीकडे विविध पक्षांचे अनेक कार्यकर्ते सतरंज्या उचलता उचलता वृद्ध झाले असून आता मात्र ते कोणत्याच निवडणुकीच्या उपयोगाचे राहिले नाहीत ! त्याचबरोबर अनेक उच्चविद्याविभूषित तरूण, उच्चशिक्षित होऊन डिग्रीचा पलिता घेऊन नौकरीसाठी वणवण फिरत आहेत ! जवळपास २०१४ पासून शाळा किंवा महाविद्यालयीन शिक्षक-प्राध्यापक क्षेत्रांत कोणतीही मेगा भारती झालेली नसतांना, अगदी सेवकाच्या पदासाठी पीएच.डी. ( डॉक्टरेट ) सारखी सर्वोच्च पदवी धारण केलेले नवतरुण-तरुणी अर्ज



करून मुलाखती देत आहेत ! याकडे तथाकथित राज्यकर्त्यांचे लक्ष आहे काय ? असे एक ना अनेक प्रश्न देशासमोर आ वासून उभे असतांना विविध धार्मिक व भावनिक आव्हाने करून लोकांना झुलवत ठेवले जात आहे ! हे धर्मनिरपेक्ष-संसदीय लोकशाहीसाठी घातक आहे !

बदलत्या काळानुसार छत्रपती शाहू महाराजांच्या राज्याप्रमाणे सर्वांना उच्च दर्जाचे प्राथमिक ते पदव्युत्तर मोफत शिक्षणाची व्यवस्था करणारी, आरोग्याचे रक्षण करणारी आणि शेवटच्या माणसाची काळजी वाहणारी संवेदनशील, खंबीर सरकारं राज्याबरोबरच देशामध्ये आणायचे असतील आणि आमदारकी-मंत्रिपद-खासदारकी याची प्रतिष्ठा कायम ठेवून शासनकर्त्यांच्या मनात देशाविषयी खरी तळमळ निर्माण करायची असेल तर एका व्यक्तीला आणि त्याच्या घराण्यातील व्यक्तीला फक्त दोनवेळाच ही संधी देण्यात यावी आणि नंतर त्यांना थांबवण्यात यावे. त्याचबरोबर प्रत्येक निवडणुकीत नवीन ३० टक्के उच्चशिक्षित, निर्व्यसनी नवतरुणांना निवडणुकीची संधी देऊन देशसेवेसाठी तयार करावे. असे कायदे संसदेत मंजूर करून घ्यावे लागतील ! असे झाल्यास प्रत्येक आमदार-खासदार-मंत्र्याला आपल्या मर्यादा लक्षात येवून त्यांचे पाय जमिनीवर राहतील.

तेंव्हा, खऱ्या अर्थाने जगामध्ये भारताचा लौकिक आणि सन्मान आणखी वाढवायचा असेल तर केवळ करपणारी "भाकरी फिरवून" म्हणजे "सत्ता बदल" करून चालणार नाही तर "भाकरी करायचा तवा" बदलावा लागेल म्हणजे सर्व सत्ताधारी लोकच बदलावे लागतील ! यावर काही प्रश्न उपस्थित होऊ शकतात. जसे की, हे लोक नवीन असतील, त्यांना राज्यकारभार चालवता येईल का ? हा प्रश्न भारत स्वतंत्र झाला तेंव्हा इंग्रजांनी सुद्धा विचारला होता, परंतु आपल्या धुरंधर नेत्यांनी गेली ७५ वर्षे आपला देश सक्षमपणे चालवला आहे ! चला तर मग, या लेखाच्या माध्यमातून जनमाणसांमध्ये हा संदेश प्रसारित करूयात आणि सर्वच सन्मानीय राजकारणी-लोकप्रतिनिधींना विनंती करूयात कि; आपण सर्वच या भारत मातेचे सुपुत्र असून इथे प्रत्येक भारतीयाला मानासन्मानाने जगण्याचा अधिकार आहे ! इथली गरीब-श्रीमंताची दरी कमी झाली पाहिजे. सर्वच नागरिक सुख-समाधानाने जगले, प्रत्येकाचा शेजारी सुखी असेल तर आपण आनंदी राहू ! बाजूच्या घरातील आक्रोश आपल्याला सुद्धा विचलित करतो, तेंव्हा "सर्वे सुखिनो भवन्तु" प्रमाणे आपण सर्व मिळून भारत मातेला आणखी सर्वोच्च स्थानी घेऊन जाऊयात आणि ज्या विरांनी आणि विचारवंतांनी सुखी-समृद्ध भारताचे स्वप्न पहिले होते त्यांची स्वप्नपूर्ती करूयात ! जय जवान ! जय किसान ! जय विज्ञान !

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**



# ऑलिम्पिकवीर नीरज चोप्राला आज पुन्हा एकदा सुवर्णपदक जिंकण्याची संधी

आधुनिक केसरी न्यूज

**स्टॉकहोम :** ऑलिम्पिक विजेता नीरज चोप्रा डायमंड लीगमध्ये भालाफेक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याची दाट शक्यता आहे. नीरज जागतिक ॲथलेटिक्समधील या प्रतिष्ठेच्या डायमंड लीग मालिकेतील स्पर्धेत चार वर्षानंतर आज, गुरुवारी प्रथमच सहभागी होणार आहे. त्यामुळे भारताच्या नीरजला आता पुन्हा एकदा सुवर्णपदक मिळणार का, याची उत्सुकता चाहत्यांना नक्कीच असेल.

तुर्कु येथील पावो नूर्मी स्पर्धेत रौप्यपदक जिंकत नीरजने नव्या मोसमास सुरुवात केली. त्याने त्यावेळी ८९.३० मीटरचा राष्ट्रीय विक्रम केला. त्यानंतर नीरजने कुओर्तेन स्पर्धेत ८६.६० मीटर अशी कामगिरी करीत सुवर्णपदक जिंकले होते. फिनलंडमधील या दोन्ही स्पर्धेत नीरजने चांगली कामगिरी करीत चाहत्यांच्या आशा उंचावल्या होत्या. त्यामुळे आता या स्पर्धेत नीरज पुन्हा एकदा सुवर्णपदकाला गवसणी घालणार का, याकडे सर्व भारतीयांचे लक्ष लागलेले असेल.

नीरज चोप्राने यावेळी सांगितले की, डिसेंबरमध्ये मी सरावास सुरुवात केली. अन्य स्पर्धकांच्या तुलनेत उशिराच पूर्वतयारी सुरू झाली. टोकियो स्पर्धेनंतर १३ ते १४ किलो वजन वाढल्याने तंदुरुस्तीकडे लक्ष दिले. यंदा मुख्य लक्ष्य जागतिक स्पर्धा तसेच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आहे.

नीरजला डायमंड लीगमधील २०१८ च्या ऑगस्टमधील झ्युरीच स्पर्धेत चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. त्यापूर्वी तो २०१७ मध्ये तीन आणि २०१८ मध्ये चार स्पर्धात सहभागी झाला होता. स्टॉकहोममधील ही डायमंड लीग जागतिक स्पर्धेपूर्वीची महत्वाची स्पर्धा आहे. या स्पर्धेत ऑलिम्पिकमधील तीनही पदक विजेते सहभागी होतील. जर्मनीच्या जोहानेस वेत्तर याने या मोसमात सर्वोत्तम कामगिरी केली आहे. नीरजने यंदा दोन स्पर्धेत जागतिक विजेत्या अँडरसन पीटर्सला मागे टाकले आहे.

**श्रीशंकरची माघार**

मुरली श्रीशंकर या स्पर्धेत उंच उडीत कसब पणास लावणार होता, मात्र त्याला व्हिसा न मिळाल्याने तो या स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही. श्रीशंकरने जागतिक स्पर्धेसाठी अमेरिकन दूतावासाकडे आपला पासपोर्ट दिला आहे. मात्र तो पासपोर्ट अमेरिकन दूतावासाने लगेच परत न केल्यामुळे श्रीशंकरला स्वीडनच्या व्हिसासाठी अर्ज करता आला नाही.

# मॅच गमावल्यानंतर खेळाडू प्रेक्षकांकडे पाहून थुंकला

आधुनिक केसरी न्यूज

**लंडन :** विंबल्डन २०२२मध्ये स्पर्धेच्या प्रतिष्ठेला धक्का बसणारी एक घटना घडली आहे. ऑस्ट्रेलियाचा टेनिसपटू निक किर्गियोस पुन्हा एकदा चर्चेत आलाय. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत ब्रिटनच्या पॉल जुबचा ३-६, ६-१,७-५,६-७(३), ७-५ असा पराभव झाल्यानंतर त्याने प्रेक्षकांना चुकीच्या पद्धतीची वागणूक दिली. सामना झाल्यानंतर निक प्रेक्षकांकडे पाहून थुंकला आणि त्याने अंपायरला छेडछाड करणारा असे म्हटले. निकने प्रेक्षकांवर आरोप देखील केला की ते त्याला त्रास देत होते. सामना सुरू असताना तो लाइन जजवर ओरडताना देखील दिसला. ऑल इंग्लंड लॉन टेनिस कोर्टवर निकची ही वागणूक प्रेक्षकांना आणि टेनिस चाहत्यांना आवडली नाही. त्याला सोशल मीडिया ट्रोल केले जात आहे. तर टेनिस कोर्टवर देखील प्रेक्षकांच्या टीकेला सामोरे जावे लागत. कोर्टवर झालेल्या प्रकाराबद्दल बोलताना निक म्हणाला, माझ्यावर सातत्याने द्वेष आणि नकारात्मकतेचा सामना करत आहे. यामुळेच मी जे काही केले ते काही चुकीचे नाही. सामना सुरू असताना प्रेक्षक ओरडत होते आणि मला खेळता येत नाही असे म्हणत होते. ते माझ्या खेळाला फालतू म्हणत होते आणि ही गोष्ट माझ्या सन्मानाची होती.



# सक्षम व सुसंस्कृत पिढी घडविण्याकडे विशेष लक्ष : डॉ. वसुधा पुरोहित

## डॉ. सौ. इं. भा. पाठक महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे नुकताच बारावीचा निकाल जाहिर झाला असून औरंगाबाद येथील डॉ. सौ. इं. भा. पाठक महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात गार्गीच्या स्वागत गीताने झाली.
याप्रसंगी बोलताना डॉ. वसुधा पुरोहित म्हणाल्या की, बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण व ध्येयापासून विचलित न होता सातत्यपूर्ण अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.
विद्यार्थ्यांच्या यशात त्यांच्या मेहनती सोबत महाविद्यालय, शिक्षक, पालक यांचा सिंहाचा वाटा निश्चितच असतो. भविष्यातील आव्हाने



पेलण्यासाठी आमचे महाविद्यालय विद्यार्थ्यांना अध्यापन बरोबरच सक्षम व सुसंस्कृत पिढी घडविण्याकडे विशेष लक्ष देते, असे प्रतिपादन डॉ. वसुधा पुरोहित यांनी केले. त्यांनी पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.
महाविद्यालयातून विज्ञान शाखेतून गुणानुक्रमे सर्वप्रथम- सृजल कुलकर्णी, द्वितीय- आर्या पांडे, तृतीय वेदश्री धनेश्वर, वाणिज्य शाखेतुन प्रथम- पटेल प्रथम, द्वितीय- चंदेल पल्लवी, तृतीय- पानसरे साक्षी. कला शाखेतून सर्वप्रथम- भाग्यश्री नंद, द्वितीय- तात्विका मराठे, तृतीय- प्राजक्ता सांगोले, एच.एस. व्ही.सी. या शाखेतून प्रथम- अमृता गाड़े, द्वितीय- विशाखा गोरे, तृतीय- चेतन मोरे या सर्व गुणवतांचा कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित, पर्यवेक्षिका प्रा. मंगल मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
तसेच याप्रसंगी अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी व प्रा. सिद्धार्थ शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.
कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. माधुरी भावसार, तर आभार प्रगटन डॉ. शोभा हनवते यांनी केले.
यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते. सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# संजय बंब यांस मालेगाव येथून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अवैध सावकारी प्रकरणातील राजेंद्र बंब यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याबाबत त्याचा भाऊ आरोपी संजय जीवनलाल बंब हा आपली अटक टाळण्यासाठी अज्ञात स्थळी पसार झालेला होता. पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, पोलीस उप अधीक्षक ईश्वर कातकाडे यांच्या मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाखेचे अधिकारी यांनी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळविली की, आरोपी संजय जीवनलाल बंब हा दि.29/6/2022 रोजी मालेगाव येथे जैन मंदीरात दर्शनासाठी येणार आहे अशी प्राप्त झालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने मालेगाव येथे सापळा रचला आणि बातमीप्रमाणे आरोपी संजय जीवनलाल बंब हा दिनेश लॉज मालेगाव येथे मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून धुळे येथे आणून नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच आज रोजी अटक आरोपीला पोलीस अभिरक्षा मिळणेकामी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

# भंगार मालाची डील पडली महागात..!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भंगार मालाची मोठी डिल करायची आहे. यात गुंतवणूक केल्यास 6 महिन्यात दुप्पट पैसे मिळतील, असे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्यांना पोलीसांनी जेरबंद केले आहे.
याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, गुन्हयातील मुख्य आरोपी जुनेद अहमद जमील शेख रा.65 (ब) अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड धुळे व त्याचा भाऊ उवेद अहमद कार्फ इद्रीस अहमद जमील शेख यांनी इतर आरोपींशी संगणमत करून गुन्हयाचा पुर्वनियोजीत कट रचला. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आरोपी जुनेद शेख याने त्याच्या नॅशनल स्क्रॅप फर्मच्या माध्यमातून गुन्हयातील तक्रारदार नमुद फर्ममध्ये गुंतवणूक केल्यास त्यातून ते स्क्रॅप मालाची व एम एस प्लेट, माईल्ड स्टील प्लेट आणि एअरक्राफ्टचा भंगार मालाची डिल करणार आहोत अशी बतावणी केली व चुकीची माहिती देवून त्यात गुंतवणूक केल्यास मोजून 6 महिन्याचा आत 50% नफ्याने परतावा देतो, असे आकर्षित आश्वासन दिले. तक्रारदार व पिडीत साक्षीदारांना प्रोत्साहीत करुन त्यांचेकडून गुंतवणूकीचे पैसे फर्मच्या बँक खात्यावर व रोखीने घेतले. त्यांना आश्वासीत केल्याप्रमाणे कोणताही मोबदला अथवा परतावा न देता त्यांची मुदल रक्कम सुध्दा परत करण्यास टाळाटाळ करत आर्थिक शोषण करून तक्रारदार व पिडीत गुंतवणूकदार यांचे 1,41,50,000 रुपयांची फसवणूक व अपहार केला.
याबाबतच्या प्राथमिक तक्रारीवरून गुन्हा दाखल आहे.
गुन्हयाच्या तपासांत फसवणुकीची रक्कम वाढण्याची शक्यता आहे. दि. 30 जून प्रस्तुत गुन्हयाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर विस्तारलेली आणि क्लिष्ट आहे, ज्यामुळे फसवणुकिच्या रक्कम वाढत आहे. गुन्हयातील मुख्य आरोपी जुनेद शेख याने अतिशय थंड डोक्याने प्रस्तुत गुन्हयाचा कट रचला असुन त्याने वर्ष 2017 ते आजपावेतो वेगवेगळे मोबाईल तसेच सिमकार्ड वापरल्याचे तपासांत निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी जुनेद शेख याने यातील तक्रारदार तसेच इतर गुंतवणूकदार यांना वेळोवळी पैसे परत करण्याचे अमिष दाखवून त्यांना सुरत, मुंबई, बडोदा, अहमदाबाद या ठिकाणी घेवून गेल्यानंतर समोरील पार्टीशी माझे बोलणे सुरू आहे तसेच थोडयाच वेळात समोरील लोक पैसे घेवून येत आहेत असे भुलचाप देवून तेथून तो पळून गेलेला आहे.
प्रस्तूत गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीने वेगवेगळया मोबाईल क्रमांकावरुन गुंतवणूकदारांशी बोलत होता. त्यावरुन असे निदर्शनात आले की, नमुद गुन्हयात आरोपी जुनेद शेख व त्याचा भाऊ इद्रिस शेख आणि त्याचे काही नातेवाईकांचा सुध्दा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभाग आहे. अर्थात आरोपी याने गुंतवणूकदारांचा फोन आल्यावर त्याच क्षणी त्यांचे इतर नातेवाईक यांना फोन करून गुंतवणूकदार आणि नातेवाईक यांचे बोलणे करुन द्यायचे व ते वेगवेगळ्या नावाने म्हणजेच तक्रारीत नमुद केलेले फैसलभाई मेमन, हयात मेमन, अबरार मेमन, राजेन्द्र गुजराती या नावाने बोलून गुंतवणूकदारांना आश्वासीत करायचे की जुनेद व इद्रिस यांनी आमच्या कंपनीमध्ये तसेच स्क्रॅपच्या बिझनेसमध्ये गुंतवणूक केली असुन आमची समोरच्या पार्टीशी डिल झाल्यानंतर मी तुमचे पैसे जुनेद मार्फत तुम्हाला परत करणार आहे. तुम्ही निश्चीत रहा, तुमच्या पैशांची जबाबदार आता आमची आहे अशा भुलथापा मारत होते. त्यावरुनच पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव यांचे कुशल मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखचे हेमंत बेंडाळे, हर्षवर्धन बहिर, हिरालाल ठाकरे, गयासुद्दीन शेख, भूषण जगताप, रविंद्र शिंपी, मनोज बावीस्कर, राजीव गिते अशांनी जळगांव अजिंठा चौफुलीवर सापळा रचुन मुख्य आरोपी जुनेद शेख यांस नमुद गुन्हयात मदत करणारा तसेच गुन्हयात निष्पन्न असलेला त्याचा लहान भाऊ उबेद अहमद ऊर्फ इद्रीस अहमद जमील शेख यांस दि.28 रोजी ताब्यात घेतले व अटक करून त्यास न्यायालयात हजर केले असता नमुद आरोपीची दि. 6 जुलैपर्यंत पोलीस अभिरक्षेत रवानगी करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील यांनी जनतेला असेही आवाहन केले आहे की, नमुद प्रकरणी कोणी पिडीत असल्यास त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क करावा.

# नम्मा होमिओपॅथीच्या यश सोहळ्याला गोविंदा, स्वप्नील जोशी उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नम्मा होमिओपॅथीने होमिओपॅथिक वैद्यकीय सेवेच्या क्षेत्रात मिळवलेले यश साजरे करून आणि आनंदी रुग्ण आणि आनंदी डॉक्टरांच्या टीमला एकत्र आणण्यासाठी, द क्लब, मुंबई येथे एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन नम्मा होमिओपॅथीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. मोरे रघु प्रसाद यांनी केले होते, बॉलीवूड सेलिब्रिटी गोविंदा आणि मराठी अभिनेता स्वप्नील जोशी यांची विशेष उपस्थिती होती.
आम्ही तुम्हाला सूचित करूया की नम्मा होमिओपॅथी ही कर्नाटक आणि महाराष्ट्रातील क्लिनिकची प्रथम क्रमांकाची होमिओपॅथिक शृंखला आहे आणि जागतिक पातळीवर प्रगत इम्युनोजेनिक मायस्मॅटिक 6व्या पिढीच्या होमिओपॅथिक उपायांच्या माध्यमातून सर्वोत्तम आरोग्य सेवा आणि उपचार प्रदान करण्याची दृष्टी आहे. नम्मा होमिओपॅथीचे भारतभरात २१ दवाखाने आहेत आणि २०० हून अधिक उच्च पात्र होमिओपॅथी आहेत आणि ८०-९०% यश दरासह जुनाट आजारांवर उपचार करण्यात २ लाखांहून अधिक यशस्वी केसेस आहेत. बॉलिवूडचा हिरो नंबर वन गोविंदा येथे स्टेजवर मराठी आणि हिंदीमध्ये सुमारे अर्धा तास बोलला. ते म्हणाले की, माझी आई होमिओपॅथी उपचार घेत असे. होमिओपॅथी ही एक अशी उपचार पद्धती आहे ज्याचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत आणि रोग मुळापासून बरा होतो.
गोविंदा पुढे म्हणाला की, आई-वडिलांचे आपल्या सर्वांच्या जीवनात खूप महत्त्व आहे, आपण आपल्या आई-वडिलांचा आदर केला पाहिजे, त्यानंतर आपण माणसे स्वतःला डॉक्टरांकडे सोपवतो, तुम्ही आमची काळजी घ्या. त्यामुळे डॉक्टरांचे महत्त्व नाकारता येत नाही. मी नम्मा होमिओपॅथीचे अभिनंदन करतो, डॉक्टरांचे आभार मानतो, तसेच या होमिओपॅथी कार्यक्रमासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल डॉ. मोरे रघु प्रसाद यांचे आभार मानतो. स्वप्नील जोशीला सिनेमाची समज आहे.
मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते स्वप्नील जोशी यांनी येथे सांगितले की, एकच हिरो नंबर वन आहे, आणि त्या कलाकाराचे नाव आहे गोविंदा. आज त्यांच्यासोबत या कार्यक्रमाचा एक भाग होणे माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे, त्यांचे ऐकणे शिकण्यासारखे आहे. नम्मा होमिओपॅथीने हजारो नव्हे तर लाखो रुग्ण बरे केले आहेत, त्यांच्यावर यशस्वी उपचार केले आहेत आणि घरातील आजारी व्यक्तीवर उपचार करणे म्हणजे संपूर्ण कुटुंबाला आनंद देणे होय. मोरे रघुप्रसाद यांनी लाखो घरांमध्ये नवी आशा, नवे धैर्य आणि नवी ऊर्जा दिली आहे.
भारताला रोगमुक्त देश बनवण्याच्या उद्देशाने नम्मा होमिओपॅथीची स्थापना २०१७ मध्ये करण्यात आली होती. नम्मा होमिओपॅथीच्या टीमने अनेक असाध्य रोगांवर उपचार केले आहेत, ज्याला असाध्य रोग म्हणतात, ५ वर्षात आणि रुग्णांना सर्वोत्तम उपाय दिले आहेत. नम्मा होमिओपॅथीचे उपचार घेऊन बरे झालेल्या रुग्णांना आमंत्रित करणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनामागचा उद्देश होता. डॉक्टर आणि रुग्णांनी नम्मा होमिओपॅथीबद्दल त्यांचे विचार आणि अनुभव प्रसारमाध्यमांसमोर शेअर केले ज्यांनी त्यांच्या तब्येतीत चांगली सुधारणा केली आहे. नम्मा होमिओपॅथीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मोरे रघु प्रसाद यांनी यावेळी बॉलिवूड स्टार गोविंदा आणि मराठी अभिनेता स्वप्नील जोशी यांचे विशेष आभार मानले.




# स्व.कृष्णराव जाधव यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** स्वावलंब शिक्षण हेच आमचे ब्रीद गरीबांच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवणारे, गोर गरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवणारे, शिक्षण महर्षी, शिक्षणाचे महामेरू जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक शिक्षण महर्षी स्व. कृष्णराव काशिनाथराव जाधव यांची जयंती कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड येथे दि.30 जून रोजी विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.
सर्वप्रथम स्व. कृष्णराव जाधव यांच्या स्मृतीस अभिवादन करून उपक्रमांना सुरुवात करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप संनसे तर आभार गणेश डव्हारे यांनी मानले. शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब चव्हाण, रवींद्र निळ, पर्यवेक्षक रावसाहेब निकम, वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव, सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.




# लाखोंची देशी दारू जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शिरपूर तालुक्यातील न्यु बोराडी गावात सुरेश गजला पावरा हा त्याचे कब्जात मोठया प्रमाणात देशी दारु बाळगुन विक्री करीत आहे. या माहितीची खात्री करून कारवाई करण्याचे तपास पथकाला आदेशित केले होते. सदर माहिती नुसार पथकाने शिरपूर तालुक्यातील न्यु बोराडी गावात सुरेश गजला पावरा याचे झोपडीजवळ सार्वजनिक जागी छापा टाकला. यावेळी तेथे सुरेश गजला पावरा याचे कब्जात देशी दारु टँगो पंच (१८० मि.लि.) च्या एकुण २८३२ बाटल्या (५९ बॉक्स) असा ९,६९,९२० रु. किंमतीचा देशी दारुचा साठा मिळुन आला असून सुरेश यास ताब्यात घेवून शिरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव यांचे मार्गदर्शनात व अधिपत्याखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, मनोज पाटील, पंकज खैरमोडे, चेतन कंखरे व मयुर पाटील यांनी केली आहे.

# आईवडिलांनी बाळ्या, बुगड्या विकून शिकविले; भटक्या जमातीतील मुलं येताहेत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात

## राजूर येथे गुणवंतांचा सत्कार : वैदू समाजातील पूनम शिवरकर दहावीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** येथील वैदू या भटक्या समाजातील विद्यार्थिनी पूनम सुरेश शिवरकर हिने इयत्ता दहावीच्या शालांत परीक्षेत कुठलाही शिकवणी वर्ग न लावता विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले. एवढे गुण मिळवणारी वैदू जमातीतील ती पहिली मुलगी ठरली. त्यामुळे भटक्या समाजातील यशस्वी मुलांचे कौतुक होऊन त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी म्हणून राजूर येथे भटक्या समाजातील गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्यानिमित्त सामाजिक कार्यकर्ते प्रा.बाळासाहेब बोराडे, प्रा.आसाराम बोटूळे, शिवाजी बांदल यांच्या हस्ते आई-वडिलांसह पुनमला शाल, श्रीफळ, पुष्पहार व शैक्षणिक साहित्य भेट देऊन गौरविण्यात आले. वैदू ही महाराष्ट्रातील एक भटकी जमात असून



पोटाची खळगी भरण्यासाठी ते गावागावी फिरत असतात.
आज या गावी तर उद्या त्या गावी असा त्यांचा दिनक्रम ठरलेला असतो. त्यामुळे या समाजातील मुलं शिक्षणापासून वंचित राहून विकासाच्या प्रवाहापासून कोसो दूर आहेत. म्हणून हा समाज आजही मागासलेला आहे. परंतु राजुर येथील वैदू समाजातील सुरेश शिवरकर आणि त्यांची पत्नी पद्मावती शिवरकर या दाम्पत्याने बाळ्या, बुगड्या, मनी, डोरले यासारखे महिला सौंदर्याचे बेनटेक्स साहित्याची गावोगावी विक्री करत, आलेल्या पैशांतून पुनमला दहावीपर्यंत शिकवले. पूनमनेही आई-वडिलांच्या कष्टाचे चीज करत दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन विशेष प्राविण्यासह यश मिळवले. कुठल्याही खाजगी शिकवणी शिवाय एवढ्या गुणांनी उत्तीर्ण होणारी वैदू जमातीतील पूनम पहिली मुलगी ठरल्याने सर्व थरांतून पुनमचे कौतुक होत आहे. त्यानिमित्ताने राजूर येथे तिचा सत्कार करण्यात आला.
यावेळी प्रा.आसाराम बोटूळे, प्रा.बाळासाहेब बोराडे, विकास राठोड, जालिंदर पुंगळे, भगवान निंबाळकर, संदीप सोनुने, मल्हारीराजे शिवरकर, पंढरीनाथ शिवरकर, तुकाराम शिवरकर, सुरेश शिवरकर, कैलास शिवरकर, शिवाजी शिवरकर, अजय शिवरकर, विजय शिवरकर, संभाजी शिवरकर यासह वैदू समाजातील महिला व पुरुष उपस्थित होते.

# समाधान वाणी यांना श्रमसेवा गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथे गेल्या आठ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात



उल्लेखनीय कार्य करत आहेत. सत्यशोधक दर्पणच्या माध्यमातून अन्याय - अत्याचाराला वाचा फोडणे तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्तमरीत्या आपल्या लेखनीच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम निरंतर सुरू आहे. महापुरुषांचा विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचेल यादृष्टीने त्यांचे पत्रकारितेत जशे नाव समाधान वाणी त्याच प्रमाणे समाधानकारक कार्य सुरू असल्याने 1 जुलै 2022 रोजी हॉटेल सिटी प्राईड नांदेड संपन्न होणार आहे. इंजी. चंद्रप्रकाश देगलूरकर हे 30 जुन रोजी सेवानिवृत्त होत असल्याने आयोजित सेवापुर्ती गौरव सोहळ्यानिमित्त विविध क्षेत्रातील 10 जणांना पुरस्कार जाहीर झाला असुन समाधान वाणी यांना पत्रकारितेत श्रम सेवा गौरव पुरस्काराची घोषणा स्वागताध्यक्ष रमेश सोनाळे यांनी केली. समाधान वाणी यांना पत्रकारितेत पुरस्कार जाहीर झाल्याने प्रा.सोमनाथ कदम, प्रा. डॉ. भगवान वाघमारे, प्रा. संजय गायकवाड, प्रा.डॉ. संजय सांभाळकर, डॉ. शरद गायकवाड, संतोष वाणी, सुनील गोराडे, लोकशाही मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष सोयगाव गोकुळसिंग राजपूत, सचिव प्रवीण तायडे, संपादक विजय खरात, सपोनि देवीदास वाघमोडे, संतोष पवार, अशोक पालके, कैलास थोरात आदींनी अभिनंदन केले असून सर्वच स्तरातून क्षेत्रातुन अभिनंदन वर्षाव होत आहे.

# वसंतराव नाईक यांची जयंती आणि नामांतराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करावा : आकाश राठोड

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची १ जुलै रोजी १०९ वी जयंती आणि कृषि विद्यापीठ नामांतराचा ९ वर्धापन दिन बंजारा, भटके विमुक्त, ओबीसी आणि बहुजन समाज बांधवाने उत्साहाने साजरा करावा, असे आवाहन गोरसेना तालुका उपाध्यक्ष मोताळा आकाश राठोड यांनी केला आहे.
या संदर्भात आकाश राठोड म्हटले आहे की, एका तांडयात जन्माला आलेल्या वसंतराव नाईक यांनी शेती आणि शेतकरी हेच केंद्र बिंदू म्हणून राजकारणात सुरुवात केली. पुसद नगर परिषदेचे नगरध्यक्ष ते महाराष्ट्रचे मुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास राहिला. महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री म्हणून राहण्याची संधी त्यांना मिळाली.
माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे कार्य हे शब्दांत व्यक्त करता येणार नाही ऐवढे मोठे काम त्यांनी केले होते. रोजगार हमी योजना सारखी गोर गरिबांच्या मदतीसाठी सर्वात अगोदर योजना राज्यात पहिली राबवली. जायकवाडी, कोयनासारखे मोठे प्रकल्प उभे करून शेतकरी बळीराजाला सुजलाम सुफलाम बनविले. शेतीसोबतच औद्योगिक क्षेत्र



विकसित करणारे राज्यातील एकमेव मुख्यमंत्री होऊन गेले. शेतकऱ्यांच्या जिवनात क्रांती घडावी त्यांनी आधुनिक पध्दतीने शेती करावी म्हणून चार कृषी विद्यापीठाची स्थापना केली. राज्यात १९७२ साली भिषण दुष्काळ पडला असताना लोकांना जिवदान दिले. नाईक साहेबांनी सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रात वंचित लोकांनी प्रगती करावी म्हणून शेवटपर्यंत प्रयत्न केले.
माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा मरणोतर सन्मान व्हावा, यासाठी परभणी कृषी विद्यापीठाला त्यांचे नाव देण्यात यावे. यासाठी नामांतर चळवळ उभी केली आणि पधंरा वर्षे लढा दिल्यांनतर १ जुलै २०१३ ला नामांतर करण्यात आले. या करिता राज्यातील तमाम बंजारा, भटके, दिन दलित ओबीसी बहुजन समाज बाधंवाने १ जुलै रोजी आधुनिक महाराष्ट्रचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती आणि नामांतराचा वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा करावा आणि आपला स्वाभिमान जिवंत ठेवावा, असे शेवटी आवाहन आकाश राठोड यांनी केले आहे.

# खरिपाच्या पिकांना आता पावसाची प्रतीक्षा

## उगवलेले पीक सुकण्याच्या मार्गावर शेतकरी राजा चिंताग्रस्त



### दुबार पेरणीचे संकट

**१९, २० व २१ जुन रोजी पेरणी केलेले बियाणे तासी लागले आहे. मात्र, पावसाचे प्रमाण कमी असल्याने बियाणे पाहीजे त्या प्रमाणात उगवले नाही. काही शेतात ओल कमी असल्याने सदर बियाणे अजुनपर्यंत उगवले नसल्याची माहीती आहे. त्यामुळे लवकर पाऊस न आल्यास या शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येणार आहे.**

**राज रामराज ठाकूर,**
**शेतकरी देवळगांव गुजरी ता.जामनेर**

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** हवामान खात्याने २२ जूनपासून चांगला पाऊस येण्याचा अंदाज वर्तविला होता. त्यामुळे हवामान खात्याच्या अंदाजावर विश्वास ठेवुन जिल्ह्यातल्या बहुतांश सावळदबारा भागातील शेतकऱ्यांनी २० जुनपासून खरीपाच्या पेरणीला सुरुवात केली. मात्र, प्रत्यक्षात अपेक्षित पाऊस पडला नाही. त्यामुळे पेरलेले बियाणे उगवले खरे. परंतु आता पाण्याअभावी हे पिके सुकण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे उगवलेले पिके वाचविण्यासाठी आता जोरदार पावसाची आवश्यकता असून वरुण राजाने मात्र डोळे बंद केले आहे.
औरंगाबाद जिल्हयाचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. त्यामुळे जिल्हयाची अर्थव्यवस्था ही शेतीवरच आहे क्षेत्र हे लागवडीखाली आहे. त्यापैकी खरीप पिकाखालील सर्वसाधारण दरवर्षी सर्वसाधारण १५ ते २० जून दरम्यान खरीपाच्या पेरणीला सुरुवात होत असते. यावर्षी पाऊस लवकर येणार म्हणून शेतकऱ्यानी जुन महीन्याच्या प्रारंभापासून पेरणीची पुर्व तयारी करून ठेवली होती.
हवामान खाल्याने २२ जूननंतर मोठ्या प्रमाणात पाऊस येणार असल्याचे संकेत दिले होते. त्यामुळे जवळपास २० जुनपासून जिल्ह्यात व सोयगाव तालुक्यात पेरणीच्या कामाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. काही शेतकऱ्यांनी सोयाबीनची टोकण पध्दतीने देखील लागवड केली आहे. २४ जुनपर्यंत काही भागात अधुनमधुन पाऊस पडला आहे. मात्र, तेव्हापासून बहुतांश भागात पाऊस आला नाही. त्यामुळे असल्याचे दिसून येते. शेतात उगावलेला पिकावर मोठा परिणाम पडत असल्याचे दिसून येते.

# नांदेड सिटीतील असावरी प्रभात शाखेची निर्मलवारी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज यांच्या पंढरपूरकडे जाणाऱ्या पालख्यांचा विसावा ज्या गावी असतो त्या ठिकाणी स्वच्छतेसाठी सुरु झालेली निर्मलवारी रा.स्व.संघ, सेवा सहयोग व संघ परिवारातील अन्यान्य संस्थाची दोन्ही पालखी मार्गातील विविध गांवचे मुक्काम तळावर निर्मलवारी द्वारा समाजास सेवा देणेसाठीची ही सेवा योजना गेल्या 6/7 वर्षापासून सुरु झाली आहे.
संघ जसे वर्षातील सहा उत्सवास प्राधान्य देते अगदी तसेच महत्व जिल्हा वा तालुका स्तरावरील स्थानीय समाजामुख उपक्रमास देते, जसे कीं सिंहगड रोड वरील विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त व महाशिवरात्री निमित्ताने धायरेश्वर मंदिरातील दर्शनार्थींची चरणसेवा. (त्यांची विनामूल्य पादत्राणे सांभाळणे). नांदेड सीटीतील आसावरी प्रभात शाखेने यावर्षी माऊलींच्या वाल्हे या गावातील पालखी तळावर निर्मलवारी द्वारा समाज सेवा देणेचे निश्चित केले होते.
या उपक्रमाचे संयोजक प्रकाश गोरे यांची सिंहगड भागाचे व्यापक बैठकीत भेट झाली. त्यांनी वाल्हे येथे द्यावयाचे उपरोक्त निर्मलवारीचे सेवा उपक्रमाची व त्यासाठीच्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती मला देऊन असावरीच्या चमू बरोबर आपणाही यावे असे आग्रहाने सांगितले. संघामध्ये अधिकारी वर्गाची इच्छा म्हणजे जशी आज्ञा समजली जाते, तसेच सहकाऱ्याच्या प्रेमळ आग्रहाचे मोल सुद्धा आज्ञे समानच मानले जाते. त्यामुळे या दोन्ही गोष्टींचे कसोशीने पालन व्हावे हा संघात जुना शिरस्ताच आहे. मला वाटते संघातील टीम बिल्डींगचे गमकही तेच असावे. तर असावरी शाखेबरोबर वाल्ह्यात निर्मल वारीत सेवा देणेसाठी सोमवारी २६ जूनला रात्रौ ८-३० वाजता आसावरी गेटवरुन आम्ही 26 पुरुष आणि 3 महिला असे एकूण 29 जण वाल्हे येथे रात्री 1 वाजता पोहचलो.
गाडीत वारकरी प्रथेप्रमाणे नामाचा गजर, स्तोत्रे, भजनी धून, गाणी, संतांच्या आठवणी, हास्य विनोद व गप्पा चालू होत्या. पावसाचा अगदी हलका शिडकावा झालेने उत्साही वातावरण होते. बोपदेव घाटात गरमागरम चहा होऊन गाडी रात्री 1 च्या सुमारास वाल्ह्यात पोहोचली. प्रथम माऊलीच्या पादुकांचे दर्शनास गेलो. दर्शन मंडपात तुरळक गर्दी होती. दर्शन रात्री १-३० वाजता अत्यंत शांतपणे झाले. दर्शन मंडपासमोर ५०-६० जणांची एक दिंडी अर्धगोलाकार उभी राहून दमल्या उत्साहात माऊलीपुढे एक भजन आळवीत होती. लीड अँड फालो स्वरूपातील खड्या आवाजातील भारदस्त शब्द, त्यास २-३ मृदंग व ५० टाळकऱ्यांची साथ श्रोत्यांच्या मनीचा ठाव घेत होती. मंडपाभोवती सर्वत्र राहुट्या पडलेल्या होत्या. त्यामध्ये व उघड्यावरही वारकरी झोपलेले होते. चालून चालून थकले भागले शरीर शांतपणे विसावले होते.मात्र झोपल्या चेहऱ्यावर विलक्षण समाधान दिसत होते. लक्षुमी कृपा न झालेले संसार व साऱ्या काळजा पांडुरंगावर सोपवून वारीसाठी निघालेले भोळे भाबडे जीव किती समाधानाने या परिसरात झोपले होते.
आम्हा २८ जणांचे ३ गट करणेत आले. प्रमुख स्वयंसेवकानी आम्हास आमच्या नियुक्त जागी पोहोचवले. दोन्ही तीरावर जालना व अंबड कडील भाविकांच्या दोन तीन दिंड्या उतरल्या होत्या. त्यातील १०००-१५०० लोकांस पहाटेचे प्रातर्विधीसाठी शौचालयाचा वापर करणेस नम्रपणे सांगणे हेच आमचे काम होते. इथे नमूद करणेस आनंद होतो की, वारकाऱ्यांपैकी एकानेही आमच्या सुचनेकडे दुर्लक्ष केले नाही. उलट जातांना आम्हास दुवा देऊनच ते जात होते.
साधारण पहाटे ३-०० वाजता वारकरी उठून त्याची आन्हिके वगैरे उरकून डोक्यावर मोठमोठी समानाची ओझी घेऊन माऊलींचे काकड आरतीस जात व लगेच चालणेस सिद्ध होत. विशी पंचविशीतील गरीब परिस्थितीतील अनेक महिला तान्हुल्याला काखेत मारत, डोईवर तुळस घेत हसतमुखाने विठ्ठल नाम घेत चाललेल्या दिसल्या, तेव्हा मात्र मनातील श्रद्धा व भक्ति बाह्य अडचणींवर कशी मात करते याचे दर्शन झाले व ज्ञानेश्वर माऊली व तुकारामा महाराजांनी समाजात रुजवलेले संस्कार माझे मनात पुन्हा अधोरेखित झाले. पहाता पहाता पहाटेचे ५ वाजले, बहुतांशी वारकरी तेथून पालखीकडे गेलेने आमचा कार्यभागही आता संपला होता.
अवघ्या १० मिनिटांत आमचे तिन्ही गट एकत्र येऊन गाडीत बसले. आलेल्या अनुभवाच्या थोड्या गप्पा झाल्या. निर्मल वारीतील माऊती सेवा रुजु करुन आम्ही पुणे मुक्कामी परतलो आता गाडी पुण्याचे दिशेने भरधाव निघाली. आठ वाजता गाडी आसावरी कट्यापाशी पोहोचली. पुढील वर्षीही अशीच निर्मळ वारी करायची असा शुभसंकल्प आताच करून सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. या निर्मळवारीची योजना जरी सर्वश्री प्रकाश गोरे व शंकरराव इंगवले यांची असली तरी अनेक हाताने त्यास मूर्त व अविस्मरणीय स्वरूप प्राप्त झाले.



# अध्यक्ष व सरपंच यांनी बैलबंडीमधून विद्यार्थ्यांची काढली मिरवणूक



आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन परिषद पुणे तसेच डाएट अमरावती यांच्या सुचनेनुसार संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील सर्व शाळेत शाळापूर्व तयारी मेळावा घेण्यात आला. त्याअनुषंगाने ISO जिल्हा परिषद उच्च प्रा. शाळा मल्हारा येथे द्वितीय शाळापूर्व तयारी मेळाव्यात आयोजन जल्लोषात करण्यात आले. सदर सोहळ्यात प्रथम बैल बंडी मधून वर्ग पहिलीच्या विद्यार्थी मिरवणूक मोठया उत्साह पूर्ण वातावरणात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तमराव शेळके, गावचे सरपंच नारायणराव बोरेकार यांनी स्वतः धूरकरी होऊन संपूर्ण गावामधून मिरवणूक काढली. या रॅलीमध्ये मोठया संकेने गावकरी मंडळी, पालक वर्ग, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष दीपक तायडे, सदस्य, तसेच शाळेतील सर्व शिक्षक आवर्जून उपस्थित होते. शाळेमध्ये सात स्टॉल लावून विद्यार्थ्यांना शाळा प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. दोन वर्षापासून विद्यार्थी पूर्व प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत. त्यामुळे सदर उपक्रमाचे सर्व स्तरावर कौतुक करण्यात आले. सदर कार्यक्रमात मल्हारा गावातील सर्व दाखलपात्र विद्यार्थी व त्यांच्या माता उपस्थित होत्या. तसेच प्रत्येक स्टॉल वर उपस्थित स्वंयमसेवकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

सदर कार्यक्रमास सरपंच नारायण बोरेकार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तमराव शेळके, उपाध्यक्ष दीपक तायडे, सदस्य दादाराव मावस्कर, बबिता निर्वार, शुभांगी भक्ते, विठ्ठल सुवारे, मुख्याध्यापक कु. शीला सोळंके, केंद्रप्रमुख श्रीकृष्ण उघडे, कल्पना चौधरी, रुपलाल बेठे, बबलू कराळे, बबिता पंडीत, किरण साकरकर, रश्मी पानझाडे, रामदास बारस्कर तसेच पालक वर्ग हजर होते. सर्व स्वंयमसेवक व माता पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे विशेष सहकार्य लाभले.



माळीवाडा ता.जि. औरंगाबाद येथील गौतमनगर वस्ती येथे अ.जा/ अ ज, बौद्ध घटकाच्या वस्तीतील विकास योजना मधून गौतम बुद्ध पुतळा परिसर येथे पेव्हर ब्लॉक बसवणे या कामाचे उद्घाटन सरपंच श्रीमती अनिता सुधाकर हेकडे व उपसरपंच कडूभाऊ कीर्तिकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माळीवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी जी.व्ही. हरदे, ग्रा.पं.सदस्य कृष्णा मुळे, प्रवीण बर्डे, धम्मपाल गायकवाड, मनेश गाजरे व ग्रा.पं. महिला सदस्य जिजाबाई भगत, मंदाकिनी कीर्तीकर, कमलबाई अस्वार, एकनाथ शिरसाट, राजू अस्वार, रामनाथ अस्वार, नितीन वानखेडे, लताबाई साठे, कमलबाई शिरसाट, अंगणवाडी कार्यकर्त्या कर्मचारी गणेश अस्वार, सुभाष शिंदे, अमोल साठे, यादव शिंगारे आदी उपस्थित होते.

# मुंबईतील पाच तरुण तावली डोंगरावर भरकटले

आधुनिक केसरी न्यूज

**अंबरनाथ :** मुंबईतील पाच तरुणांचा गट हा भटकंतीसाठी सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये असलेल्या तावली डोंगरावर आला होता. मात्र डोंगरावरील वाट चुकल्याने ते अडकून बसले होते. अडकलेल्या तरुणांनी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षाकडे मदत मागितली होती. त्यानंतर तातडीने हिललाईन पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने या पाचही तरुणांची सुटका केली आहे.

पावसाळ्यात मलंगगडच्या डोंगराळ भागात पर्यटनासाठी तरुण मोठ्या संख्येने येत असतात. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना रस्ते आणि परिसरातील माहिती नसल्याने तरुण अडकतात. त्यामुळे पर्यटकांची मोठी कोंडी झालेली असते. डोंगराळ भागात मोबाइलचे नेटवर्क देखील नसल्याने ते कोणाशी संपर्क देखील करू शकत नाहीत. मात्र, भरकटलेल्या पाच पर्यटकांपैकी प्रणव जगताप याने रविवारी संध्याकाळच्या सुमारास ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षाकडे मदतीची मागणी केली होती. त्यानंतर तातडीने हिललाईन पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक जयेश पादीर आणि संभाजी नपते यांनी कुशिवली येथील ग्रामस्थ सुभाष पाटील व इतरांसह तावली डोंगर गाठून या पाचही तरुणांची सुटका केली.




# जय बाबाजी भक्त परिवाराने 'संभाजीनगर' नामकरणासाठी राबविली होती विशेष मोहीम !

## फटाक्यांच्या आतिषबाजीत केले नामकरणाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने निष्काम कर्मयोगी जगदगुरू जनार्दन स्वामी महाराज धर्मपीठाचे पिठाधिश्वर उत्तराधिकारी श्रीसंत सदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रेरनेने औरंगाबाद जिल्ह्याचे नामकरण कुठल्याही परिस्थितीत संभाजीनगर करावे अशी लोकशाहीच्या माध्यमातून आग्रह मागणी धरणारी विशेष मोहीम सलग चार महिने रथयात्रेसह राबविली आणि बजाज नगर येथे लक्षवेधी स्वरूपात 'शंभू मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात हजारोंच्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवला होता. आता औरंगाबादचे नामकरण संभाजीनगर असे झाल्याने जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने फटाक्यांच्या आतिषबाजीत आनंदोत्सव साजरा करून स्वागत करण्यात आले.

जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने औरंगाबादचे नामकरण संभाजीनगर करावे अशी गेल्या अनेक वर्षांपासूनची आग्रही मागणी होती. त्यासाठी भक्त परिवाराने शासनाला वर्षानुवर्ष पत्रव्यवहारही केले होते. कुठल्याही परिस्थितीत संभाजीनगर असे नामकरण करावे असा आग्रह धरणारी मोहीम लोकशाहीच्या माध्यमातून भक्त परिवाराने नुकतीच राबविण्यात आली होती. सलग चार महिने जनजागृती व रथयात्रेसह विशेष मोहीम यावेळी भक्त परिवाराच्या वतीने राबविण्यात आली होती. महाराष्ट्र ही संत आणि शूरवीरांची भूमी आहे. त्यांच्या त्याग, आणि बलिदानाची भूमी आहे. या भूमीला आणि तेथील जिल्ह्याला शूरवीरांचे नावेच द्यायला हवीत. असा लोकशाहीच्या माध्यमातून आग्रह धरणारी विशेष मोहीम निष्काम कर्मयोगी जगदगुरू जनार्दन स्वामी महाराज धर्मपीठाचे पिठाधिश्वर उत्तराधिकारी श्रीसंत सदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रेरनेने गेल्या चार महिन्यांपासून जय बाबाजी भक्त परिवार आणि धर्मयोद्धा संघाच्या वतीने राबविण्यात आली. शंभुराजेंना इतिहासातील सर्वात मोठी आदरांजली वाहणाऱ्या या विशेष मोहिमेचे आयोजन भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

याबरोबरच हजारो भाविकांचा सहभाग असलेला भव्य आणि लक्षवेधी 'शंभू मेळावा' बजाज नगर येथे आयोजित करण्यात आला. मेळाव्यास अध्यात्म शिरोमणी श्रीसंत सदगुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांची विशेष मार्गदर्शन केले होते. आता औरंगाबादचे नामकरण संभाजी नगर झाल्याने जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजधानी आश्रम वेरूळसह विविध आश्रम परिसरात फटाक्यांच्या आतिषबाजीत आनंदोत्सव साजरा करत स्वागत करण्यात आले.



# निर्माते संतोष चव्हाण यांचा बालगंधर्व पुरस्काराने सन्मान

## चित्रपटसृष्टी आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बालगंधर्व रंगमंदिरांच्या 54 व्या वर्धापन दिना निमित्त उद्योजक आणि चित्रपट निर्माते संतोष चव्हाण यांना कला क्षेत्रात विशेष कामगिरी केल्याबद्दल बालगंधर्व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. बालगंधर्व परिवार संस्थेच्या वतीने आयोजित बालगंधर्व महोत्सवात हा पुरस्कार दिग्दर्शक अभिनेते प्रवीण तरडे, अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते संतोष चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. यावेळी बालगंधर्व परिवाराचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले उपस्थित होते.

संतोष चव्हाण हे मराठी चित्रपटसृष्टीत मागील 20 वर्षाहून अधिक काल सक्रिय आहेत. निर्माते, उद्योजक असलेले चव्हाण आपल्या व्यस्त वेळेतून कोणत्याही संकटात कलाकार, तंत्रज्ञ यांच्या मदतीला धावतात. कला क्षेत्रात कार्यरत राहताना त्यांनी स्वतः चे असे एक व्यावसायिक विश्व निर्माण केले आहे. सन 1998 पासून मराठी - हिंदी चित्रपटसृष्टी मध्ये कार्यरत आहेत, या कारकिर्दीत त्यानी अनेक चित्रपट, मालिका, वेबसिरीज, नाटक यासाठी निर्मिते, सहनिर्माते म्हणून काम केले आहे, तसेच अभिनया बरोबरच संहिता लेखन आणि काही नाटकांसाठी दिग्दर्शनाची धुरा देखील त्यांनी सांभाळली आहे.

आजमितीला संतोष चव्हाण यांच्या 14 कंपन्याची यशस्वी घोडदौड चालू असून 20 हजार पेक्षा जास्त लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात ते यशस्वी झाले आहेत. व्यवसायाचा हा डोलारा सांभाळताना संतोष चव्हाण या वल्लीने समाजकार्याची कास कधीच सोडली नाही. आज आपल्या TRADING कंपनी च्या माध्यमातून संतोष चव्हाण यांनी 27 हजाराहून अधिक लोकांना ट्रेडिंग चे मोफत प्रशिक्षण देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवले आहे.

पुणे आणि पिंपरी चिंचवड मधील कलाकार तंत्रज्ञ मंडळी साठी मोफत रुग्णवाहिका लवकरच सुरू करणार आहे.

तसेच आपल्या को- ऑपरेटीव्ह सोसायटीच्या माध्यमातून कलाकार व तंत्रज्ञ मंडळीसाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे. आपल्या खिलाडूवृत्तीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या संतोष चव्हाण यांची क्रीडा क्षेत्रात ही उल्लेखनीय यश मिळवले आहे, क्रिकेट मध्ये रणजी पर्यंत मजल मारताना, फूल मॅरेथॉन प्रकारामध्ये 30 पारितोषिके पटकवली आहेत.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी

आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत

पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्रीमती छायाताई खेडकर 8888780568

श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910